2) 5839, 5093, 5872, 5829

चढता क्रम : ______________________________

3) 2167, 1679, 3847, 5000

चढता क्रम : ______________________________

4) 6493, 6394, 4693, 3625

चढता क्रम : ______________________________

**III. खालील संख्या उतरत्या क्रमात लिहा.**

1) 2765, 3847, 1629, 4867

उतरता क्रम: ______________________________

2) 3926, 3967, 3908, 3937

उतरता क्रम: ______________________________

3) 4798, 4792, 4087, 4800

उतरता क्रम : ______________________________

4) 8620, 8629, 8630, 8624

उतरता क्रम : ______________________________

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## दिलेल्या अंकापासून चार अंकी संख्या तयार करणे :

दिलेल्या अंकापासून तीन अंकी संख्या कशी तयार करतात हे आपण अगोदरच शिकलो आहोत. आता आपण चार अंकी संख्या कशा तयार होतात ते पाहू.




वर्गातील टेबलवर तीन अंक कार्ड आहेत . ती अंक कार्ड वापरून विद्यार्थी वेगवगेळ्या संख्या तयार करतील . ( अंक कार्ड वापरून खालील संख्या तयार करतील)

| अंक कार्ड | तयार केलेल्या संख्या |
| --- | --- |
| 5 3 7 → | 537 , 375 , 753 , |
| | 357 , 735 , 573 , |

वरील संख्येतील कोणती सर्वात मोठी संख्या तयार केली ? 753 ( सातशे त्रेप्पन)

753 संख्येमधील प्रत्येक अंकाचे निरीक्षण करा अंक 7,5 आणि 3 हे कोणत्या क्रमात आहेत ? (उतरत्या क्रमात)

**निरीक्षण :–** दिलेल्या अंकापासून मोठी संख्या तयार करायची असेल तर दिलेले अंक उतरत्या क्रमात मांडा.

वरील सख्यांमधील कोणती संख्या लहान आहे ? (357)

357 मधील प्रत्येक अंकाचे निरीक्षण करा.

अंक 3,5 अणि 7 हे कोणत्या क्रमात आहेत ? (चढत्या क्रमात)

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**निरीक्षण :**
दिलेल्या अंकापासून लहान संख्या तयार करायची असेल तर दिलेले अंक चढत्या क्रमात मांडा.

**कृती1:**

वर्गातील टेबलवर एका बॉक्स मध्ये खालील अंक कार्ड ठेवली आहेत.

| 8 | 0 | 3 | 7 | 6 | 9 | 5 | 1 | 4 | 2 |

कोणतीही चार अंककार्ड उचलून टेबलवर ठेवा. समजा तुम्ही

ही अंक कार्ड उचलली. | 3 | 6 | 4 | 8 |

वरील अंक कार्ड वापरून चार अंकी मोठी संख्या लिहा.

अंक उतरत्या क्रमात मांडा.

अंकाचा उतरता क्रम | 8 | 6 | 4 | 3 |

संख्या मिळाली 8, 6, 4, 3 (आठ हजार सहाशे )

∴ चार अंकी मोठी संख्या 8,643 आहे.

परतूं , लहान चार अंकी संख्या कोणती आहे? ती 3,6,4 आणि 8 या अंकापासून मिळते

अंक चढत्या क्रमात मांडा

चढत्या क्रमात अंक आहेत | 3 | 4 | 6 | 8 |

संख्या मिळाली 3,468 (तीन हजार चारशे अडुसष्ट)

∴ मिळालेली चार अंकी लहान संख्या आहे = 3,468

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**कृती 2:** मंन्थाने बॉक्स मधील चार अंक-कार्ड बाहेर काढली ती अकं कार्ड [7], [5], [0] व [8] आहेत .वरील चार अंक कार्ड वापरून कोणती चार अंकी मोठी संख्या तयार होते?

मोठी संख्या मिळविण्यासाठी तिने ते अंक उतरत्या क्रमात मांडले.

उतरता क्रम [8] [7] [5] [0]

संख्या तयार होते 8750 (आठ हजार सातशे पन्नास).

∴ मोठी संख्या आहे 8,750

[7], [5], [0], [8] हे अंक वापरून कोणती लहान संख्या तयार होते?

मंन्था त्यांना चढत्या क्रमात मांडेल.

उतरता क्रम : 0, 5, 7, 8

तिने संख्या तयार केली 0,578

तिने ती वाचली 0,578 (पांचशे अठ्ठयात्तर) तीन अंकी संख्या0578 स्थान बदला5078 (पाचं हजार अठ्ठयात्तर), 0578 मध्ये सहस्त्र स्थान नाही.म्हणून ही तीन अंकी संख्या बनली.




विचार करून तिने शिक्षकांकडे पाहीले. शिक्षकांनी तिची शंका खालीलप्रमाणे दुर केली. जर संख्येत 0 (शून्य) मोठया स्थान-मूल्याला येत असेल तर शून्य (0) त्यासंख्येत धरत नाहीत.

(0578 = पांचशे अठ्ठयात्तर)

0578 ही तीन अंकी संख्या आहे.

अशा प्रसंगी शून्याचे स्थान मूल्य मोठ्या स्थान मूल्यापासून बाजूच्या स्थानमूल्याबरोबर बदलले. 0,5,7 आणि 8 या अंका पासून 5078 ही चार अंकी संख्या बनते (पांच हजार अठ्ठयात्तर)

∴ 5078 ही चार अंकी लहान संख्या आहे. ती 0,5,7 आणि 8 या अंकापासून तयार केली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**लक्षात ठेवा:**

दिलेल्या अंकामध्ये जेव्हा शून्य अंक दिलेला असेल तर लहान संख्या तयार करताना खालील नियम वापरा

- शून्य धरून ते अंक चढत्या क्रमात मांडा.
- शून्य स्थान व पुढील स्थान यांची अदला बदल करून राहीलेले अंक तसेच लिहा.

**कृती 3 :**

6, 2, 0 आणि 5 हे अंक वापरून कोणती लहान संख्या तयार होत?

| | |
|---|---|
| • दिलेले अंक चढत्या क्रमात मांडा.<br>• शुन्य स्थान व त्यापुढील स्थान यांची अदलाबदल करून राहीलेले अंक तसेच लिहा. | चढता क्रम = 0, 2, 5, 6<br>= 2, 0, 5, 6<br>लहान संख्या = 2,056 |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**विचार करा :** वरील उदाहरणात 0256 ही लहान संख्या नाही का?

**तुम्ही हे करा.**

1) [6],[9],[7],[1] हे दिलेले सर्व अकं वापरून

तयार करता येणारी मोठी संख्या _____________आहे.

तयार करता येणारी लहान संख्या _____________आहे.

2) [4],[0],[3],[7] हे दिलेले सर्व अंक वापरून

तयार करता येणारी मोठी संख्या _____________आहे.

तयार करता येणारी लहान संख्या_____________आहे.

## स्वाध्याय 2.6

**I. खाली रिकाम्या जागा भरा.**

1) [4], [6], [8], [5] हे अकं वापरून तयार होणारी मोठी संख्या __________ आहे

2) 3,046 ही __________ अंकी संख्येचे उदाहरण आहे.

3) 0,734 ही __________ अंकी सख्ंया आहे

4) [3], [1], [0], [9] हे अंक वापरून तयार होणारी लहान चार अंकी संख्या __________ आहे

**II. सांगितल्याप्रमाणे लिहा.**

1) 5, 8, 7, 2 हे अंक वापरून चार अंकी –

सर्वात मोठी संख्या तयार करू शकतो ती __________

सर्वात लहान संख्या तयार करू शकतो ती __________

2) 2, 8, 9, 0 हे अंक वापरून चार अंकी –

सर्वात मोठी संख्या तयार करू शकतो ती __________

सर्वात लहान संख्या तयार करू शकतो ती __________

3) 3, 5, 2, 9 हे अंक वापरून चार अंकी –

सर्वात मोठी संख्या तयार करू शकतो ती __________

सर्वात लहान संख्या तयार करू शकतो ती __________

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

प्रकरण–3

# बेरीज

V4C1Q8

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही :**

- चार अंकी संख्याचे गट न करता बेरीज कराल.
- हातचा घेऊन चार अंकी संख्यांची बेरीज कराल.
- त्यांच्या स्थान मूल्य तक्त्यानुसार संख्या लिहून दैनंदिन जीवनातील उदाहरणे सोडवू शकाल.
- बेरजेच्या पद्धती समजावून घेऊन लगेच बुध्दीचातुर्याने बेरीज कराल.

तीन अंकी संख्यांची बेरीज तुम्ही यापूर्वीच शिकला आहात यांचे निरीक्षण करा–

**उदाहरण :** दुकानात वेगवेगळ्या वस्तू त्यांच्या किंमतीसह उपलब्ध आहेत. निरीक्षण करून खाली दिलेल्या प्रश्नांचे उत्तर द्या.




NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## आ) या दुकानात

- कॅल्क्युलेटरची किंमत किती आहे? ____________________
- मिक्सरची किंमत किती आहे? ____________________
- रेडिओची किमंत किती आहे?____________________
- मोबाईलची किंमत किती आहे? ____________________

### खालील उदाहरणांचे निरीक्षण करा:

दुकानामधून एका शेतकऱ्याने खालील वस्तू खरेदी केल्या. त्यांची एकूण किंमत किती?




©KTBS
TO BE REPUBLISHED

स्थान मूल्यानुसार या वस्तूंच्या किंमतीची बेरीज करू.

वरील किंमती चित्रकृती चिन्हानुसार दाखविल्या असून त्यांची बेरीज करा.




| तपशील | गट | | | |
|---|---|---|---|---|
| | सहस्त्र | शतक | दशक | सुटे |
| 1) मोबाईलची किंमत ₹2454 | 1000 1000 | 100 100 100 100 | 10 10 10 10 10 | 1 1 1 1 |
| 2) कॅलक्युलेटरची किंमत ₹324 | | 100 100 100 | 10 10 | 1 1 1 1 |
| एकूण ₹2778 | 1000 1000 | 100 100 100 100 100 100 100 | 10 10 10 10 10 10 10 | 1 1 1 1 1 1 1 1 |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

बेरीज करण्याची पद्धत स्थान मूल्य तक्त्यात कशी लिहितात त्याचे निरीक्षण करा.

| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| 1) मोबाईलची किंमत ₹ | 2 | 4 | 5 | 4 |
| 2) कॅलक्युलेटरची किंमत ₹ | | 3 | 2 | 4 |
| | 2 | 7 | 7 | 8 |

एकूण किंमत = ₹ 2778.

रुपये दोन हजार सातशे अठ्ठयात्तर फक्त.

**पायरी 1**

- सुटे स्थानातील अंकाची प्रथम बेरीज करा.
- नंतर, अनुक्रमे दशक, शतक, आणि सहस्त्र स्थानांची बेरीज करा.

**2) एका गृहिणीने खालील वस्तू दुकानातून खरेदी केल्या एकूण त्या वस्तूंची किंमत किती होते ?**




वरील वस्तूंच्या किंमत चित्रकृती चिन्हानुसार दाखवून त्यांची बेरीज करून निरीक्षण करा.

| तपशील | गट | | | |
|---|---|---|---|---|
| | सहस्त्र | शतक | दशक | सुटे |
| 1) टेपरेकॉर्ड्रची किंमत ₹2420 | 1000 1000 | 100 100 100 100 | 10 10 | |
| 2) मनगटी घड्याळ ची किंमत ₹1349 | 1000 | 100 100 100 | 10 10 10 10 | 1 1 1 1 1 1 1 1 1 |
| एकूण ₹3769 | 1000 1000 1000 | 100 100 100 100 100 100 100 | 10 10 10 10 10 10 | 1 1 1 1 1 1 1 1 1 |

बेरीज करण्याची पद्धत स्थान मूल्य तक्त्यात कशी लिहितात त्याचे निरीक्षण करा.

| तपशील | | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|---|
| 1) टेपरेकॉर्ड्रची किंमत | ₹ | 2 | 4 | 2 | 0 |
| 2) मनगटी घड्याळ ची किंमत | ₹ | 1 | 3 | 4 | 9 |
| एकूण | ₹ | 3 | 7 | 6 | 9 |

**बेरीज पद्धत**

अंक त्यांच्या मूल्यस्थानात लिहून सुटे स्थानापासून सुरुवात करून त्या अंकांची बेरीज केली आहे त्याचे निरीक्षण करा.

एकूण किंमत = ₹ 3769 रुपये तीन हजार सांतशे एकोणसत्तर.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**तुम्ही हे करा::** 1) वस्तूंच्या किंमती स्थान मूल्य तक्त्यात लिहून त्यांची एकूण बेरीज करा.

a)







| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| ₹ | | | | |
| ₹ | | | | |
| एकूण ₹ | | | | |

b) यांची बेरीज किती?

₹3626 + ₹5243

| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| ₹ | | | | |
| ₹ | | | | |
| एकूण ₹ | | | | |

c) यांची बेरीज किती?

1) 5476 + 213

2) 3048 + 2851

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## हातचा घेऊन बेरीज :

**उदाहरण 1:** एका गि-हाईकाने खालील वस्तू खरेदी केल्या त्या वस्तूंची एकूण किंमत किती आहे?






₹3847 + ₹2454 = ?

या वस्तूंच्या किंमती चित्रकृती चिन्हानुसार दाखवून त्यांची बेरीज करून निरीक्षण करा.

| तपशील | गट | | | |
|---|---|---|---|---|
| | सहस्त्र | शतक | दशक | सुटे |
| | 1000 | 100 | 10 | |
| 1) मिक्सर ची किंमत ₹3847 | 1000 1000 1000 1000 1000 | 100 100 | 10 10 10 10 | 1 1 1 1 1 1 1 |
| 2) मोबाईलची किंमत ₹2454 | 1000 1000 | 100 100 100 100 | 10 10 10 10 10 | 1 1 1 1 |
| एकूण किंमत: ₹6301 ₹6301(सहा हजार तीनशे एक) | 1000 1000 1000 1000 1000 1000 | 100 100 100 | | 1 |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**पायरी 1**

सुटे स्थानात अंक 7 व 4 ची बेरीज केली तर आम्हांला 11 मिळतात. यात 1 दशक व 1 सुटे आहते. 1 अंक सुटे स्थानात लिहा. दशक स्थानात 1 दशक गटात लिहा.




**पायरी 2**

आता1,4 व 5 दशक स्थानी आहेत . त्यांची बेरीज केल्यास 10 दशक मिळतात. 10 दशक हे 1 शतक व 0 दशक आहेत. 0 हे दशक स्थानाला आणि हातचा शतक स्थानाला घ्या.




**पायरी 3**

शतक स्थानी 1 शतक, 8 शतक व 4 शतक यांची बेरीज 13 शतक मिळते. 13 शतक हे 1 सहस्त्र व 3 शतक आहेत. 3 हे शतक स्थानाला आणि हातचा सहस्त्र स्थानाला घ्या.




**पायरी 4**

आता आपण सहस्त्र स्थानातील अंकांची बेरीज करू. येथे 1 सहस्त्र,3 सहस्त्र व 2 सहस्त्र, यांची बेरीज येते 6 सहस्त्र. 6 हे सहस्त्र स्थानी लिहा.म्हणून गिऱ्हाईकाने खरेदी केलेल्या वस्तूंची एकूण किंमत आहे ₹6301 (रुपये सह हजार तीनशे एक)




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 2:** दुकानातून फिलोमिनाने खालील वस्तू खरेदी केल्या. त्यांची एकूण किंमत काढा







टेपरेकॉर्डरची किंमत
मिक्सरची किंमत

| स | श | द | सु |
|---|---|---|---|
| | ① | ① | |
| 3 | 2 | 9 | 8 |
| 3 | 8 | 4 | 7 |
| 7 | 1 | ①4 | ①5 |

एकूण किंमत = ₹7,145 (रुपये सात हजार एकशे पंचेचाळीस) येथे सुटे स्थानापासून संख्यांची बेरीज केली असता, त्यांच्या योग्य स्थानात हातचा उजव्या बाजूला मिळविला जातो. निरीक्षण करा.

**उदाहरण 3:**

3895, 2436, 159 यांची बेरीज किती येते?

संख्या प्रथम स्थान मुल्यानुसार लिहा. नंतर मागील उदाहरणानुसार बेरीज करा.

| स | श | द | सु |
|---|---|---|---|
| ① | ① | ② | |
| 3 | 8 | 9 | 5 |
| 2 | 4 | 3 | 6 |
| | 1 | 5 | 9 |
| 6 | ①4 | ①9 | ①0 |

पुढील स्थानाला हातचा न घेता, हातचा मनात ठेऊन आपण बेरोज करू शकतो.

$$\begin{array}{r} 3{,}895 \\ 2\,436 \\ +\ \ 159 \\ \hline 6{,}490 \end{array}$$

एकूण किंमत = ₹ 6,490

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**हे तुम्ही करा:**

1) 4675 + 3452

| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | 4 | 6 | 7 | 5 |
| + | 3 | 4 | 5 | 2 |
| | | | | |

2) 5368 + 2097

| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | 5 | 3 | 6 | 8 |
| + | 2 | 0 | 9 | 7 |
| | | | | |

3) 359 + 4276+ 2573

| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | 3 | 5 | 9 |
| | 4 | 2 | 7 | 6 |
| + | 2 | 5 | 7 | 3 |
| | | | | |

4) 3948 + 206 + 92

| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | 3 | 9 | 4 | 8 |
| | | 2 | 0 | 6 |
| + | | | 9 | 2 |
| | | | | |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**तोंडी उदाहरणे:**

आमच्या दैनंदिन जीवनात अनेक प्रसंगी अनेक उदाहरणे आपण मनात सोडवितो.

**उदाहरण :** या प्रमाणे दोन प्रसंग आठवून ते लिहा

1) ________________________________________

2) ________________________________________

मनाने उदाहरणे सोडविताना आम्ही वेगवेगळ्या पद्धती वापरतो

## खालील उदाहरणांचे निरीक्षण करा.

1) 328 आणि 241 यांची बेरीज किती येते?

**पद्धत-1**

दिलेल्या एका संख्येचा विस्तार करा आणि क्रमाने बेरीज करा

328 + 241 = ?

= 328 + (200 + 40 + 1)

328 +200= 528

528 + 40 = 568

568 + 1 = 569

∴ 328 +241= 569

**पद्धत-2**

दिलेल्या एका संख्येचा विस्तार करा आणि सुटे स्थानानुसार क्रमाने बेरीज करा

328 + 241 = ?

= 328 + (200 + 40 + 1)




∴ 328 + 241 = 569

2) 5347 आणि 2635 यांची बेरीज किती येते?

**पद्धत-1**

5,347 + 2,635 = ?

= 5347 + (2000+600+30+5)

5347 + 2000 = 7347

7347 + 600 = 7947

7947 + 30 = 7977

7977 + 5 = 7982

बेरीज = 7982

**पद्धत-1**

5347 + 2635 = ?

= 5347 + (2000+600+30+5)




बेरीज = 7982

**हे तुम्ही करा :** दोन दिलेल्या संख्येमधील एका संख्येचा विस्तार करून तिची पहिल्या संख्येबरोबर बेरीज करा.

1) 643 + 250

2) 6145 + 2236

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## कृती : बेरजेचा खेळ

खालील तक्त्यातील संख्या पहा. उभ्या स्तंभात किंवा आडव्या पंक्तीत असलेल्या दोन संख्यावर एक-एक चिंचोका ठेवा (दुसरी एखादी वस्तू). त्या संख्यांची बेरीज करा पण बेरीज 5000 पेक्षा जास्त असावी.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3820 | 2200 | 1750 | 6300 | 3000 | 4137 |
| 4150 | 376 | 4920 | 2157 | 3156 | 1698 |
| 1598 | 2900 | 4213 | 1828 | 2986 | 3800 |
| 2520 | 4840 | 238 | 5786 | 2184 | 5790 |
| 1546 | 3275 | 3426 | 3248 | 2900 | 1000 |
| 6376 | 2821 | 1680 | 4495 | 1000 | 9000 |

जर बेरीज 5000 पेसा जास्त आली तर प्रत्येक बरोबर गणिताला 5 गुण

जर 100 गुण मिळविलेस तर तू जिकशील. 150 गणु मिळवशील तर तू चॅम्पियन होशील. प्रयत्न करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### उदाहरण 2

**फिलोमिना या पद्धतीने गणित सोडविते.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. 3820<br>+ 2200<br>6020 | 2. 4213<br>+ 238<br>4451 | 3. 2986<br>+ 3800<br>6786 | 4. 1546<br>+ 6376<br>7922 |

फिलोमिनाला 15 गुण मिळाले का? विचार करा.

## कृती1 माकडाची चेष्टा

येथे एक फळा आहे. त्यावर अंककार्डचा उपयोग करून बेरजेची उदाहरणे सोडविली आहेत . प्रत्येक उदाहरणाची एकूण बेरीज केलेली असून ती सुद्धा लिहिली आहे.

जवळच असलेल्या झाडावरील माकडाने काही अंक कार्ड घेऊन गेली आहेत .

माकडाने घेऊन गेलेली अंककार्ड शोधा व चौकोनात लिहा.



| | |
|---|---|
| 5 2 4 6<br>3 4 2 8<br>□ 6 7 □ | 3 5 2 9<br>2 3 4 □<br>5 □ 7 0 |
| 2 5 4 3<br>5 3 8 4<br>7 □ □ 7 | □ 4 2 6<br>7 8 0 5<br>9 2 3 □ |
| 3 4 5<br>4 □ 9<br>7 8 4 | 6 9 0<br>2 6 □<br>□ □ 4 |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय 3.1

**I. खालील संख्या चित्रकृती चिन्हानुसार असून त्यांची बेरीज स्थान मूल्य तक्त्यात दाखवा.**

1) 


| स | शे | द | सु |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

2) 


| स | शे | द | सु |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**II. स्थानमुल्यानुसार खालील संख्या लिहून त्यांची बेरीज करा.**

1) 6371 + 421

| स | से | द | सु |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

2) 6039 + 2920

| स | शे | द | सु |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

3) 3487 + 5203

| स | शे | द | सु |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

4) 4675 + 2397

| स | शे | द | सु |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

## III. बेरीज करा:

a.

| 1) | 2) | 3) | 4) |
|---|---|---|---|
| 6432 | 5490 | 6754 | 5213 |
| + 3264 | + 3507 | + 2135 | + 3673 |
| | | | |

b.

| 1) | 2) | 3) | 4) |
|---|---|---|---|
| 3468 | 5894 | 4372 | 5097 |
| + 4127 | + 3263 | + 3009 | + 3865 |
| | | | |

c.

| 1) | 2) | 3) | 4) |
|---|---|---|---|
| 2493 | 5 | 8267 | 5596 |
| 371 | 20 | 329 | 2267 |
| + 44 | + 5374 | + 149 | + 1413 |
| | | | |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## IV. जादूई चौरसाची शक्ती –

जादूई चौरसाने संख्यांची बेरीज स्तंभानुसार, पंक्तीनुसार व कोपऱ्यापासून कोपऱ्यापर्यंत करा. प्रत्येक वेळी बेरजेची तुलना करा. तुमचे निरीक्षण तुमच्या मित्राना व शिक्षकांना दाखवा.

| | | |
|---|---|---|
| 1726 | 1558 | 2398 |
| 2566 | 1894 | 1222 |
| 1390 | 2230 | 2062 |

**कृती :**

**खालील चौरसामधील निरीक्षण करा.**

| | | |
|---|---|---|
| 2 | 7 | 6 |
| 9 | 5 | 1 |
| 4 | 3 | 8 |

प्रत्येक पंक्ती व स्तंभातील अंकांची बेरीज करा. तसेच तिरकस सुध्दा बेरीज करा. तुम्ही काय निरीक्षण केलात?

सर्वांमध्ये अंकांची बेरीज समान येते असे आढळते. वरील चौरसाचे निरीक्षण करुन त्याचप्रमाणे 12 ने सुरुवात करुन दुसरा चौरस रचा. (तुमच्या शिक्षक/मित्राबरोबर चर्चा करा.)

## IV खालील उदहरणे सोडवा–

1) एका धान्यकोठारात 2360 क्विंटल ज्वारी व 3427 क्विंटल मका आहे. तर धान्यकोठारात एकूण किती धान्य साठविले आहे?

2) पंचायतीच्या एका भागामध्ये 4275 पुरुष, 4312 स्त्रिया आणि 1380 मुले आहेत. तर त्या भागामध्ये एकूण लोकसंख्या किती आहे?

3) एका सर्कस कंपनीला दिवसाच्या पहिल्या शोला ₹ 6375 आणि दुसऱ्या शोला ₹ 2895 मिळाले. तर त्या दिवशी एकूण किती रुपये कंपनीला मिळाले?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण –4

# वजाबाकी

Y3H8W7

**या प्रकरणाच्या अध्ययनानतंर तुम्ही हे शिकाल :**

- हातचा न घेता 4 अंकी संख्यांची वजाबाकी कराल.
- हातचा घेऊन 4 अंकी संख्यांची वजाबाकी कराल.
- दैनंदिन जीवनातील समस्या सोडवाल.
- वजाबाकीच्या पद्धती समजावून घेऊन मनाने व त्वरीत वजाबाकी कराल.

तीन अंकी संख्यांची हातचा घेऊन व हातचा न घेता वजाबाकी तुम्ही याअगोदरच शिकला आहात. 4 अंकी संख्यांची वजाबाकी करण्याच्या पद्धती समजावून घेण्यासाठी खालील उदाहरणाचे निरीक्षण करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 1:**




जून महिन्यासाठी रेशन दुकानाला 5890 कि.ग्रॅम तांदूळ पुरविला गेला. त्या महिन्यात 4650 कि.ग्रॅम तांदुळ विकला गेला. तर महिन्याच्या शेवटी किती तांदूळ शिल्लक राहीला?

पद्धत : पुरविलेल्या एकूण तांदळामधून विकलेला तांदूळ वजाबाकी करा.

| तपशील | स | श | द | सु | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरविलेला एकूण तांदूळ | 5 | 8 | 9 | 0 | कि.ग्रॅम | → | व्यवकल्य |
| विकलेला एकूण तांदूळ | 4 | 6 | 5 | 0 | कि.ग्रॅम | → | व्यवकलक |
| शिल्लक तांदूळ | 1 | 2 | 4 | 0 | कि.ग्रॅम | → | (बाकी)फरक |

∴ शिल्लक राहीलेला एकूण तांदूळ = 1,240 कि.ग्रॅम

**उदाहरण 2:**

जुन महिन्यासाठी 3268 कि.ग्रॅम ज्वारी पुरविली होती. त्यातील 125 कि.ग्रॅम ज्वारी महिन्याच्या शेवटी शिल्लक राहीली. तर त्या महिन्यात एकूण किती ज्वारी विकली गेली ?

| तपशील | स | श | द | सु | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरविलेला ज्वारी | 3 | 2 | 6 | 8 | कि.ग्रॅम | → | व्यवकल्य |
| शिल्लक राहीलेली ज्वारी | 0 | 1 | 2 | 5 | कि.ग्रॅम | → | व्यवकलक |
| विकलेली एकूण ज्वारी | 3 | 1 | 4 | 3 | कि.ग्रॅम | → | (बाकी)फरक |

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**खालील उदाहरणांचे निरीक्षण करा :**

**1) 5647 मधून 3143 वजा करा**

येथे 5647 ही व्यवकल्य आहे आणि 3143 ही व्यकलक आहे. व्यवकल्यतून व्यवकलक वजा करा.

|   | 5 | 6 | 4 | 7 | → व्यवकल्य |
|---|---|---|---|---|---|
| − | 3 | 1 | 4 | 3 | → व्यवकलक |
|   |   |   |   |   | → (बाकी)फरक |

2) **9684 मधून 3041 वजा करा**

येथे कोणती संख्या व्यवकल्य? (9684)

कोणती संख्या व्यवकलक आहे? (3041)

9684 मधून 3041 वजा करा

|   | 9 | 6 | 8 | 4 | → व्यवकल्य |
|---|---|---|---|---|---|
| − | 3 | 0 | 4 | 1 | → व्यिवकलक |
|   |   |   |   |   | → (बाकी)फरक |

**हे तुम्ही करा :**

1) 5876 मधून 3755 वजा करा

2) 3800 मधून 6827 वजा करा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## हातचा घेऊन वजाबाकी

**उदाहरण 1:**

एका स्वयंसेवी संस्थेचे बचत खाते एका सहकारी बँकेत उघडले होते.मदत म्हणून सरकारने त्यांच्या बॅक खात्यांला ₹ 8950 जमा केले संस्थेने शिलाई मशीन खरेदी करण्यासाठी त्या खात्यातील ₹5397 काढले. तर त्यांच्या खात्यात किती रक्कम शिल्लक राहीली?



| | | |
|---|---|---|
| जमा केलेली रककम | = | ₹8950 |
| काढलेली रककम | = | ₹5397 |
| शिल्लक रक्कम | = | ₹ ? |

**या उदाहरणाचे उत्तर पायऱ्या पायऱ्यानी पहा.**

| | |
|---|---|
| **पायरी : 1**<br>व्यवकल्य मध्ये 0 सुटे स्थानात आहेत . 0 मधून 7 वजा करणे शक्य नाही. म्हणून दशक स्थानामधून 1 दशक हा-तचा घेऊन सुटे स्थानात मिळवा. अपनाला 10 + 0 =10 मिळतात. 10 मधून 7 वजा केल्यास 3 मिळतात. आता व्यवकल्य मध्ये दशकस्थानात 4 मिळतात. | स श द सु<br>4 10<br>8 9 ~~5~~ ~~0~~<br>− 5 3 9 7<br>3 |
| **पायरी : 2**<br>आता व्यवकल्य मध्ये दशक स्थानात 4 मधून 9 वजाबाकी करणे शक्य नाही.म्हणून , शतक स्थानामधून 1 शतक हातचा घेऊन तो दशक स्थानात मिळवा. आपणाला 10 + 4 = 14 दशक स्थानात मिळतात. 14 मधून 9 वजा केल्यास आपणाला 5 मिळतात. आता शतक स्थानात 8 मिळतात. | स श द सु<br>14<br>8 4 10<br>8 ~~9~~ ~~5~~ ~~0~~<br>− 5 3 9 7<br>5 3 |
| **पायरी : 3**<br>व्यवकल्य मध्ये शतक स्थानात 8 मधून 3 वजा केल्यास आपणास 5 शतक मिळतात. | स श द सु<br>14<br>8 4 10<br>8 ~~9~~ ~~5~~ ~~0~~<br>− 5 3 9 7<br>5 5 3 |
| **पायरी : 4**<br>व्यवकल्य मध्ये सहस्त्र स्थानात 8 मधनू 5 वजा केल्यास आपणास 3 सहस्त्र मिळतात.<br>∴ खात्यावर शिल्लक राहीलेली रक्कम आहे ₹3,553 | स श द सु<br>14<br>8 4 10<br>8 ~~9~~ ~~5~~ ~~0~~<br>− 5 3 9 7<br>3, 5 5 3 |

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

हे उदाहरण आपण चित्रमय पद्धतीने सोडवू शकतो? खालील उदाहरणाचे निरीक्षण करा.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 9 5 0<br>− 5 3 9 7 | | | | |
| फरक : 3 5 5 3 | 3 | 5 | 5 | 3 |

खात्यावर शिल्लक असलेली रक्कम आहे ₹ 3,553

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## उदाहरण 2:

खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी शाळेला ₹9750 मंजूर झाले. त्यामधील बॅडमिंटन, थ्रोबॉल, क्रिकेट सेट इ. मैदानी खेळासाठी ₹5918 चे साहित्य खरेदी केले. तर राहिलेली रक्कम कॅरम, बुद्धीबळ इ.बौद्धिक खेळाच्या साहित्य खरेदीसाठी घेतली. तर बौद्धिक खेळाच्या साहित्यासाठी किती किंमतीचे साहीत्य खरेदी केले ?



| तपशील | | | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 8 | 17 | 4 | 10 |
| मंजरू झालेली रक्कम | = | ₹ | ~~9~~ | ~~7~~ | ~~5~~ | ~~0~~ |
| मैदानी खेळ साहित्याची खरेदी किंमत | = | ₹ | 5 | 9 | 1 | 8 |
| बौद्धिक खळे साहीत्य खरेदी किंमत | = | ₹ | 3 | 8 | 3 | 2 |

बौद्धिक खेळ साहित्य खरेदीसाठी शिल्लक रक्कम = ₹ 3,832

**खालील उदाहरणांचे निरीक्षण करा :**

1) 5074 मधून 3267 वजा करा

येथे 5074 व्यवकल्य आहे आणि 3267 व्यवकलक आहे.

| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| | 4 | 10 | 6 | 14 |
| | 5 | 0 | 7 | 4 |
| − | 3 | 2 | 6 | 7 |
| | 1 | 8 | 0 | 7 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 5 | 0 | 7 | 4 | → व्यकल्य |
| − | 3 | 2 | 6 | 7 | → व्यवकलक |
| | 1 | 8 | 0 | 7 | → (बाकी)फरक |

2) 6300 मधून 3928 वजा करा

थेथे 6300 व्यवकल्य आहे 3928 व्यवकल्य आहे

| | स | श | द | सु |
|---|---|---|---|---|
| | | 12 | 9 | |
| | 5 | 2 | 10 | 10 |
| | 6 | 3 | 0 | 0 |
| − | 3 | 9 | 2 | 8 |
| | 2 | 3 | 7 | 2 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 6 | 3 | 0 | 0 | → व्यकल्य |
| − | 3 | 9 | 2 | 8 | → व्यवकलक |
| | 2 | 3 | 7 | 2 | → (बाकी)फरक |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**हे तम्ही करा :**

1) 9372 मधून 8045 वजा करा. 2) 8402 मधून 7835 वजा करा.

## तोंडी/ बौद्धिक उदाहरणे

जेव्हा संख्याची वजाबाकी करतो तेव्हा मनात वजाबाकी करण्याची पद्धत येते. प्रत्येकाची वजाबाकी करण्याची पद्धत वेगवेगळी असू शकते. या उदाहरणांचे निरीक्षण करा.

**उदाहरण 1:** 673 मधून 241 वजा करा.

| **पद्धत1** | **पद्धत 2** |
|---|---|
| व्यवकलकचा विस्तार करा आणि क्रमाने वजाबाकी करा. | व्यवकलकचा विस्तार करा आणि क्रमाने संख्यारेषेवर वजाबाकी करा. |
| 673 – 241 = ? | 673 – 241 = ? |
| 673 – (200 + 40 + 1) | 673 – (200 + 40 + 1) |
| • 673 – 200 = 473<br>• 473 – 40 = 433<br>• 433 – 1 = 432 | <br> |
| ∴ 673 - 241 = 432 | ∴ 673 - 241 = 432 |

**उदाहरण 2:** 900 मधून576 वजा करा.

| **पद्धत 1** | **पद्धत 2** |
|---|---|
| 900 – 576 = ? | 900 – 576 = ? |
| = 900 – (500 + 70 + 6) | = 900 – (500 + 70 + 6) |
| • 900 – 500 = 400<br>• 400 – 70 = 330<br>• 330 – 6 = 324 | <br> |
| ∴ 900 - 576 = 324 | ∴ 900 - 576 = 324 |

**उदाहरण 3:** 9000 मधून 5348 वजा करा.

| **विधान 1** | **विधान 2** |
|---|---|
| 9000 – 5348 = ? | 9000 – 5348 = ? |
| = 9000 – (5000 + 300 + 40 + 8) | = 9000 – (5000 + 300 + 40 + 8) |
| • 9000 – 5000 = 4000<br>• 4000 – 300 = 3700<br>• 3700 – 40 = 3660<br>• 3660 – 8 = 3652 | <br> |
| ∴ 9000 - 5348 = 3652 | ∴ 9000 - 5348 = 3652 |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**हे तुम्ही करा:** व्यवकलक चा विस्तार करून वजाबाकी मिळवा. याचप्रमाणे प्रश्न तयार करा व मनात सोडविण्याची पद्धत तयार करून प्रयत्न करा.

| 1) 328 - 125 | 2) 693 - 258 | 3) 3690 - 1264 | 4) 8000 - 3578 |
|---|---|---|---|
| | | | |

## स्वाध्याय 4.1

**I. खालील उदाहरणे सोडवा.**

1) $\begin{array}{r} 3865 \\ -\ 2430 \\ \hline \end{array}$

2) $\begin{array}{r} 8369 \\ -\ 5043 \\ \hline \end{array}$

3) $\begin{array}{r} 9576 \\ -\ 2345 \\ \hline \end{array}$

4) $\begin{array}{r} 5650 \\ -\ 3970 \\ \hline \end{array}$

**II.**

1) $\begin{array}{r} 5372 \\ -\ 3859 \\ \hline \end{array}$

2) $\begin{array}{r} 6907 \\ -\ 3245 \\ \hline \end{array}$

3) $\begin{array}{r} 8700 \\ -\ 3297 \\ \hline \end{array}$

4) $\begin{array}{r} 9000 \\ -\ 5382 \\ \hline \end{array}$

5) $\begin{array}{r} 8030 \\ -\ 3867 \\ \hline \end{array}$

6) $\begin{array}{r} 6004 \\ -\ 2345 \\ \hline \end{array}$

7) $\begin{array}{r} 3928 \\ -\ 2593 \\ \hline \end{array}$

8) $\begin{array}{r} 8004 \\ -\ 3108 \\ \hline \end{array}$

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**III. खालील उदाहरणे सोडवा.**

1) एका शेतकऱ्याने 3290 कि.ग्रम ज्वारी पिकविली. त्यातील घरातील उपयोगासाठी 1376 कि.ग्रम ज्वारी ठेवली. राहीलेली ज्वारी त्याने विकली. तर एकूण किती ज्वारी त्याने विकली?

| | | | |
|---|---|---|---|
| शेतकऱ्याने पिकविलेली एकूण ज्वारी | = | | कि.ग्रम |
| घरातील उपयोगासाठी ठेवलेली एकूण ज्वारी | = | | कि.ग्रम |
| राहीलेली ज्वारी | = | | कि.ग्रम |

2) कामगार एका महिन्याला ₹9500 मिळवितो. त्यातील ₹3268 तो घरखर्चासाठी खर्च करतो. तर त्याने एकूण किती रुपये बचत केली?

| | | |
|---|---|---|
| महिन्याचे उत्पन्न | = | |
| महिन्याचा खर्च | = | |
| बचत | = | |

3) देणगीदारांकडून शाळेच्या शैक्षणिक कार्यासाठी ₹8250 मिळाले शाळेच्या शैक्षणिक कार्यासाठी खर्च करून ₹894 शिल्लक राहीले. तर शैक्षणिक कार्यासाठी एकूण किती रुपये खर्च केले?

| |
|---|
| |
| |
| |
| |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

4) पाण्याची टाकी भरण्यासाठी 8000 लिटर पाणी लागते त्या टाकीत 6398 लिटर पाणी आहे. टाकी भरण्यासाठी अजून किती लिटर पाणी लागेल?

**हे समजावून घ्या:**



वजाबाकी मध्ये ताळा केला जातो

1) 2836 मधून 1329 वजा करा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 2 | 16 | |
| 2 | 8 | ~~3~~ | ~~6~~ | → व्यवकल्य |
| 1 | 3 | 2 | 9 | → व्यवकलक |
| 1 | 5 | 0 | 7 | → फरक(बाकी) |

**ताळा :** व्यवकलक + फरक = व्यवकल्य

$$\begin{array}{r} 1329 \\ +\ 1507 \\ \hline 2836 \\ \hline \end{array}$$

2) 8000 में से 2593 घटाइए

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | 9 | 9 | 10 | |
| ~~8~~ | ~~0~~ | ~~0~~ | ~~0~~ | → व्यवकल्य |
| 2 | 5 | 9 | 3 | → व्यवकलक |
| 5 | 4 | 0 | 7 | → फरक(बाकी) |

**ताळा :** व्यवकलक + फरक = व्यवकल्य

$$\begin{array}{r} 2593 \\ +\ 5407 \\ \hline 8000 \\ \hline \end{array}$$

तुम्ही करत असलेल्या प्रत्येक उदाहरणाचा ताळा करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण –5

# गुणाकार

G2U1S3

**या प्रकारच्या अध्ययनानंतर तुम्ही :**

- गुणाकार हा पुनरावर्तीत बेरीज आहे हे समजावून घ्याल.
- गुणाकारामध्ये असलेली अनेक पदे समजावून घ्याल.
- गुणाकारमधील मूळ क्रिया ओळखाल
- संख्येला 1 अंकाने व 2 अंकानी गुणाल.( हातचा घेऊन/हातचा न घेता ज्यांचा गुणाकार 9999 पेक्षा जास्त नाही).
- दैनंदिन जीवनामध्ये आलेली गुणाकाराची उदाहरणे समजावून घ्याल
- गुणाकाराची अंदाजे किंमत काढाल.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**तुम्ही या अगोदर मागील वर्गात, एक अंकी संख्यांचा गुणाकार शिकला आहात.**

**उदाहरण :** 1) 6 × 8 = 48 2) 12 × 6 = 72

वरील उदाहरणात दिलेला गुण्य, गुणक व गुणाकार ओळखा.

| उदाहरण | गुण्य | गुणक | गुणाकार |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |

## गुणाकार हा पुनरावर्तीत बेरीज आहे

**कृती 3:** रोहितकडे 5 पेन्सिल बॉक्स आहेत. प्रत्येक बॉक्स मध्ये 6 पेन्सिल आहेत. तर रोहितकडे एकूण किती पेन्सिल आहेत?

आकृतीचे निरीक्षण करा.



आकृतीमधील पेन्सिल ठेवण्याच्या बाक्सचे निरीक्षण करा. प्रत्येक बॉक्समधील पेन्सिली मोजा.

6 + 6 + 6 + 6 + 6 = 30

मागील इयत्ते मध्ये शिकलेली बेरजेची पद्धत आठवा. पांच वेळा संख्यांची बेरीज न करता आपण "X' चिन्ह वापरून संक्षिप्त स्वरूपात लिहू .

6 × 5 = 30

म्हणून गुणाकार हा समान संख्येची पुनरावर्तीत बेरीज आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## हातचा न घेता गुणाकार

**उदाहरण :** एका बॉक्समध्ये 8 खोडरबर आहेत . अशा 4 बॉक्समध्ये किती खोडरबर असतील?

एकूण बॉक्स = 4

प्रत्यके बॉक्समधील खोडरबर = 8

∴ एकूण खोडरबर = 8 + 8 + 8 + 8 = 32

येथे 8 ची 4 वेळा पुनरावृर्ती झाली आहे.

∴ 8 × 4 = 32

8 × 4 = 32

गुण्य गुणक गुणाकार

**लक्षात ठेवा:**

- गुणाकार हा पुनरावर्तीत बेरजेची क्रिया आहे.
- ज्या संख्येला आपण गुणणार आहोत तिला 'गुण्य' म्हणतात.
- ज्या संख्येने आपण गुणणार आहोत तिला 'गुणक' म्हणतात.
- दोन संख्येचा गुणाकार करून मिळणाऱ्या उत्तराला 'गुणाकार' म्हणतात.

## गुणाकाराचे गुणधर्म

### I . 1 ने गुणून होणारे गुणाकाराचे गुणधर्म–

**उदाहरण 1:**



- येथे किती फ्लॉवर पॉट आहेत?

  तीन

- प्रत्येक फ्लॉवर- पॉट मध्ये किती रोपटी आहेत?

  एक

- तिन्ही फ्लॉवर-पॉट मध्ये किती रोपटी आहेत?

  3 × 1 = 3

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 2 :**



5 × 1 = 5

- वरील आकृतीत किती आयत आहेत?
  पांच
- प्रत्येक आयतात किती बिंदू आहेत?
  एक
- सर्व आयतामध्ये एकूण किती बिंदू आहेत?
  5 × 1 = 5

जर आम्ही वरील उदाहरणाचे निरीक्षण केले तर

'एखादी संख्या आणि 1 यांचा गुणाकार नेहमी ती संख्यांच असते.

**प्रयत्न करा :**

1) 10×1 =............................ 2) 1×55 =............................

3) 100×1=............................ 4) 8×1 =............................

## II. शून्यच्या गुणाकाराचा गुणधर्म–

दिलेल्या उदाहरणाचे निरीक्षण करा:

7 × 0 = 0

15 × 0 = 0

वरील उदाहरणांचा गुणाकार किती? निरीक्षण करा.

वरील उदाहरणात, गुणाकार शुन्य आहे. वरील उदाहरणावरून आम्ही असे अनुमान काढू शकतो कि,

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जेव्हा एखाद्या संख्येला शून्य ने गुणले तर गुणाकार नेहमी शून्य असतो. .

## गुणाकाराच्या क्रमाचे तत्व

आकृतीमध्ये दोन वेगवेगळ्या प्रकारानी चांदण्यांची रचना खाली दाखविली आहे.

| उभ्या स्तंभात रचना | आडव्या पंक्तीत रचना |
|---|---|
|  |  |
| आकृती (a) मध्ये दाखविलेल्या चांदण्याच्या रचनेचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे घ्या.<br>येथे किती स्तंभ आहेत?<br>प्रत्येक स्तंभात किती चांदण्या आहेत?<br>सर्व स्तंभात मिळून एकूण किती चांदण्या आहेत? 5 × 3 = 15 | आकृती (b) दाखविलेल्या चांदण्याच्या रचनेचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे घ्या.<br>येथे किती पंक्ती आहेत?<br>प्रत्येक पंक्तीत किती चांदण्या आहेत?<br>सर्व पंक्तीत मिळून एकूण किती चांदण्या आहेत? 3 × 5 = 15 |

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**वरील कृतीतून आपण कोणते निरीक्षण केले?**

5 × 3 = 3 × 5 = 15

**दोन्ही रचनेमध्ये गुणाकार हा समान आहे. त्याच प्रमाणे,**

5 × 7 = 7 × 5 = 35

20 × 8 = 8 × 20 = 160

जर आम्ही गुण्य व गुणक यांचा क्रम बदलला तर दोन संख्यांचा गुणाकार बदलत नाही. यालाच गुणाकाराच्या क्रमाचे तत्व म्हणतात.

## स्वाध्याय 5.1

**I. योग्य उत्तराने रिकाम्या जागा भरा.**

1) 9 + 9 + 9 = 9 × ☐ = ☐

2) 3 + 3 + 3 + 3 + 3 + 3 + 3 + 3 = ☐ × 8 = ☐

3) 5 + 5 + 5 + 5 = ☐ × ☐ = ☐

4) 6 + 6 + 6 + 6 + 6 = ☐ × ☐ = ☐

**II. प्रत्येक सटाची पुनरावर्तीत बेरीज आणि गुणाकार लिहा.**

**उदाहरण :**



3 + 3 = 6

2 × 3 = 6

1) 

____________________

____________________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2)



______________________

______________________

3)



______________________

______________________

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**III. गुणाकाराचे गुणधर्म वापरून खालील रिकाम्या जागा पूर्ण करा.**

1) 75 × ______ = 75

2) 93 × 0 = ______

3) 37 × 42 = 42 × ______

4) 1 × 555 = ______

5) 15 × ______ = 20 × 15

6) 7623 × ______ = 0

## गुणाकाराचा तक्ता (0 ते 10)

| × | 0 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 1 | 0 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 2 | 0 | 2 | 4 | 6 | 8 | 10 | 12 | 14 | 16 | 18 | 20 |
| 3 | 0 | 3 | 6 | 9 | 12 | 15 | 18 | 21 | 24 | 27 | 30 |
| 4 | 0 | 4 | 8 | 12 | 16 | 20 | 24 | 28 | 32 | 36 | 40 |
| 5 | 0 | 5 | 10 | 15 | 20 | 25 | 30 | 35 | 40 | 45 | 50 |
| 6 | 0 | 6 | 12 | 18 | 24 | 30 | 36 | 42 | 48 | 54 | 60 |
| 7 | 0 | 7 | 14 | 21 | 28 | 35 | 42 | 49 | 56 | 63 | 70 |
| 8 | 0 | 8 | 16 | 24 | 32 | 40 | 48 | 56 | 64 | 72 | 80 |
| 9 | 0 | 9 | 18 | 27 | 36 | 45 | 54 | 63 | 72 | 81 | 90 |
| 10 | 0 | 10 | 20 | 30 | 40 | 50 | 60 | 70 | 80 | 90 | 100 |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### वरील तक्त्याचे निरीक्षण करा.

गुणाकाराच्या वरील टेबलवरून गुणाकाराचे वेगवेगळे गुणधर्म तुमच्या शिक्षकांच्या मदतीने ओळखा.

### 10, 100 आणि 1000 ने गुणाकार

एका संख्येला दोन अंकी संख्येने कसे गुणतात हे तुम्ही याअगोदर शिकला आहात–

आपण एका संख्येला 10, 100 आणि 1000 ने कसे गुणतात ते शिकूया –

## खालील गुणाकाराचे निरीक्षण करा–

**उदाहरण 1:** 1) 9 × 10 = 9 × 1 दशक = 9 दशक = 90

2) 12 × 10 = 12 × 1 दशक = 12 दशक = 120

तुमचे निरीक्षण काय आहे?

जेव्हा एका संख्येला 10 ने गुणतो, तेव्हा त्यांचा गुणाकार गुण्यच्या उजव्या बाजूला शून्य देऊन मिळालेल्या संख्येईतका असतो.

**उदाहरण 2:** 1) 9 × 100 = 9 × 1 शतक = 9 शतक = 900

2) 12 × 100 = 12 × 1 शतक = 12 शतक = 1200

वरील उदाहरणाचे तुमचे निरीक्षण काय आहे ?

जेव्हा एका संख्येला 100 ने गुणतो, तेव्हा त्यांचा गुणाकार हा गुण्यच्या उजव्या बाजूला दोन शून्य देऊन मिळालेल्या संख्येईतका असतो.

**उदाहरण 3:** 1) 9 × 1000 = 9 × 1 हजार = 9 हजार = 9000

जेव्हा एका संख्येला 1000 ने गुणतो, तेव्हा त्यांचा गुणाकार हा गुण्यच्या उजव्या बाजूला तीन शून्य देऊन मिळालेल्या संख्येइतका असतो.

वरील सर्व उदाहरणावरून आम्ही असे समजू शकतो की, एखाद्या संख्येला शेवटी 0 अंक असलेल्या संख्येने गुणले असता गुण्य आणि शून्य असलेल्या गुणकाचा गुणाकार करून शेवटी गुणकच्या एकूण शेवटी असलेले शून्य (0) लिहावेत.

**उदाहरण 4:** 1) 8 × 10 = 80 2) 3 × 200 = 600

3) 2 × 4000 = 8000 4) 40 × 10 = 400

5) 60 × 30 = 1800

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय 5.2

**I. योग्य उत्तराने रिकाम्या जागा भरा.**

1) 3 × 100 = ________

2) 9 × 50 = ________

3) 9 × 500 = ________

4) 7 × 400 = ________

5) 24 × 200 = ________

6) 2 × 3000 = ________

7) ________ × 70 = 350.

8) 20 × 60 = ________

## एक अंकी आणि दोन अंकी संख्येंचा गुणाकार

**कृती :** 15 मुलांना बोलवून त्यांना एका रांगते उभे करा. त्यांना छत्री चे चित्र असलेले व खरेदी किंमत ₹160 लिहिलेली कार्ड द्या. नंतर ते कार्ड मुलाना हातात धरायला सांगा. एका मुलाला बोलावून त्याला खालील प्रश्न विचारा व उत्तरे मिळवा.

शिक्षक : किती मुले रांगेत उभी आहेत?

मुलगा : 15 मुले

शिक्षक : एका छत्रीची खरेदी किंमत किती आहे?

मुलगा : ₹ 160

शिक्षक : किती मुलांनी खरेदी किंमत ₹160 असलेली कार्ड हातात धरली आहेत?

मुलगा : 15 मुलांनी

शिक्षक : 160 ही संख्या किती वेळा आली आहे?

मुलगा : 15 वेळा.

आता आम्हाला 15 छत्र्यांची एकूण किंमत काढायला पाहिजे. हे कसे काढाल? हे काढण्यासाठी 160 व 15 चा गुणाकार केला पाहीजे.

म्हणून

$$\begin{array}{r} 160\times15 \\ \hline 800 \\ 1600 \\ \hline 2400 \end{array}$$

800 → 160 ला 5 ने गुणून

1600 → '160 ला 10 ने गुणून

म्हणून, 15 छत्र्यांची खरेदी किंमत = ₹ 2400

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 1:**

एक ट्रकमध्ये कांद्याची 142 पोती आहेत. तर 12 ट्रकमध्ये किती कांद्याची पोती असतील?

काद्यांची एकूण पोती = 142 × 12

गुणाकाराच्या पद्धतीनुसार 12 हा गुणक आहे. यामध्ये 1 दशक व 2 सुटे आहेत. प्रथम गुण्य 142 ला 2 सुटे ने गुणावे नंतर 1 दशक ने गुणावे.

**पायरी 1 :** 142 ला 2 सुटे ने गुणा

$$\begin{array}{r} 142 \times 2 \\ \hline 284 \end{array}$$

**पायरी 2 :** 142 ला 1दशक ने गुणा

$$\begin{array}{r} 142 \times 10 \\ \hline 1420 \end{array}$$

**पायरी 3 :** जेव्हा आपण दोन्ही गुणाकाराची बेरीज करू

∴ एकूण काद्यांची पोती 1704

$$\begin{array}{r} 142 \times 2 \\ \hline 284 \\ 1420 \\ \hline 1704 \end{array}$$

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 2 :**

एका पॅकेटमध्ये 12 पेन्स आहेत. दुकानात अशी 100 पॅकेट आहेत.तर एकूण किती पेन्स दुकानात आहेत?

एका पॅकेटमधील पेन्स = 24

$$\begin{array}{r} 24 \times 100 \\ \hline 2400 \end{array}$$

दुकानात असलेली पॅकेटस् = 100

∴ एकूण दुकानात असलेली पेन्स = 2400

## स्वाध्याय 5.3

**I. खालील गुणाकार करा.**

1) 31 × 4

2) 50 × 3

3) 210 × 40

4) 52 × 22

5) 231 × 31

6) 102 × 43

**II. खालील उदाहरणे सोडवा.**

1) एक मीटर कापडाची किंमत ₹32 आहे. तर 4 मीटर कापडाची किंमत किती?

2) एक कि.ग्रॅम तांदळाची किमत ₹40 आहे. तर 5 कि.ग्रॅम तांदळाची एकूण किंमत किती?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) एका सिनेमा थिएटर मध्ये खुर्च्यांच्या 32 रांगा असून त्या प्रत्येक रांगेत 42 खुर्च्या आहेत. तर सिनेमा थिएटरमध्ये एकूण किती खुर्च्या आहेत ?

4) सोमाण्णा आपल्या कारखान्यात 122 विटा एका दिवसात तयार करतो तर तो 24 दिवसांत किती विटा तयार करील?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## हातचा घेऊन गुणाकार

**कृती :**

रोमा आपल्या वडिलांच्या बरोबर दुकानात गेला. त्याने 3 साबण खरेदी केले. प्रत्येक साबणाची किमत ₹18 आहे. तर त्याने दुकानदाराला किती रक्कम द्यायला पाहिजे? वडिल रोमाला मदत करतील? विचार करा.



रोमाने आपल्या वडिलांना खालीलप्रमाणे हिशोब सांगितला. बाबा, 3 साबण खरेदी केले. प्रत्येक साबणाची किंमत ₹18 आहे. म्हणून मी ₹54 द्यायला पाहिजे. बाबा, हे बरोबर आहे का? वडील म्हणाले,

हे कसे केलीस?

ती म्हणाली,

₹18 ला 3 ने गुणून.

**पायरी 1:** 8 ला 3 ने गुणा

(2)
1 | 8 × 3
→ 4

$8 \times 3 = 24$

4 सुटे स्थानाला लिहा आणि हातचा 2 दशक स्थानाला लिहा.

**पायरी 2 :** 1 ला 3 ने गुणा

$1 \times 3 = 3$ दशक

गुणाकारामध्ये 2 मिळवा $3 + 2 = 5$

5 हे दशकस्थानात लिहा.

(2)
1 8 × 3
54

∴ 3 साबणाची किंमत ₹54

**उदाहरण 1 :** एका पिशवीत 47 नारळ आहेत. तर 8 पिशवीत एकूण किती नारळ असतील?

एकूण नारळ $47 \times 8$

**पायरी 1:** 7ला 8 ने गुणा

(5)
4 | 7×8
→ 6

$7 \times 8 = 56$

6 हे सुटे स्थानाला व 5 हातचा दशक स्थानाला लिहा.

**पायरी 2:** 4 ला 8 ने गुणा $4 \times 8 = 32$ दशक

गुणाकारात 5 मिळवा $32 + 5 = 37$.

(5)
4 7×8
376

7 हे दशक स्थानी आणि 3 हे शतक स्थानी लिहा.

एकूण नारळ = 376

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 2:**

जर एका पंख्याची किंमत ₹655 आहे, तर 15 पंख्यांची किंमत किती होईल?

1 पंख्यांची किंमत = ₹655

एकूण 15 पंख्यांची किंमत = ₹9825

```
  655 x 15
 3275
 655
 9825
```

## स्वाध्याय 5.4

**I. खालील गुणाकार करा.**

1) 75 × 8

2) 627 × 7

3) 445 × 6

4) 83 × 26

5) 75 × 48

6) 395 × 24

**II. खालील उदाहरणे सोडवा**

1) एका शाळेला जाणाऱ्या मुलाने प्रत्येक महिन्याला ₹25 बचत केली. तर तो एका वर्षात किती बचत करील?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

2) एका पॅकेटमध्ये 75 चॉकलेट आहेत. अशा 7 पॅकेटमध्ये किती चॉकलेट असतील?

3) एका पिशवीमध्ये 25 कि.ग्रॅम तांदूळ आहे. अशा 68 पिशव्यामध्ये किती वजनाचा तांदूळ असेल?

4) एका वहीत 96 पाने आहेत. अशा 45 वहीत एकूण किती पाने असतील?

5) शाळेच्या एका कार्यक्रमासाठी ₹900 खर्च केले. तर अशा 11 कार्यक्रमाना किती खर्च होईल ?

6) निता एका महिन्याला 200 खेळणी तयार करते. तर ती 3 वर्षात किती खेळणी तयार करील?

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## जॉन नेपियर (John Napier) यांनी शोधून काढलेल्या आणखी एका गुणाकाराची पद्धत.

**उदाहरण 1 : 43 × 6**




**पायऱ्या:**

- दोन चौकोन काढा.
- भाज्य चौकोनाच्या वरच्या बाजूला लिहा.
- भाजक चौकोनाच्या उजव्या बाजूला लिहा
- दशक स्थानाला गुणा आणि त्यांचा गुणाकार पहिल्या चौकोनात लिहा.

  4 × 6 = 24
- सुटे स्थानाला गुणा आणि त्यांचा गुणाकार दुसऱ्या चौकोनात लिहा.

  3 × 6 = 18
- उदाहरणात दाखविल्याप्रमाणे बेरीज करा

  ∴ 43 × 6 = 258.

वरील पद्धत वापरून मोठ्या संख्यांचा गुणाकार करू शकतो.

**उदाहरण 2 : 57 आणि 48 चा गुणाकार करा.**




∴ 57 × 48 = 2736

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 3 :**

**273 ला 36 ने गुणा.**




$\therefore$ 273 × 36 = 9828

गुणाकाराच्या या पद्धतीला चौरसाकृती पद्धत (Lattice method) म्हणतात किंवा कर्णाकृती पद्धत (diagonal method) म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय 5.5

**I. चौरसाकृती पद्धत (Lattice method) वापरून खालील गुणाकार करा.**

1) 52× 9




$\therefore$ 52 × 9 =

2) 712 × 5




$\therefore$ 712 × 5 =

3) 75 × 36




$\therefore$ 75 × 36 =

4) 242 × 42




$\therefore$ 242 × 42 =

## गुणाकाराची अंदाजे किंमत

| चित्र (1) | चित्र (2) |
|---|---|
|  |  |
| ₹ 99 | ₹ 102 |

चित्राचे निरीक्षण करा

आकृती (1) मधील टी-शर्टची किंमत किती आहे?

₹ 99

आकृती (2) मधील टी-शर्टची किंमत किती आहे?

₹ 102

सर्वसाधारणपणे, टी-शर्टची किंमत ₹ 100 आहे. यालाच 'अंदाजे' किंमत म्हणतात

> याच प्रमाणे संख्यांची अंदाजे किंमत ही 10,100,1000 च्या जवळ असेल तर त्याला अंदाजे किंमत म्हणतात.

**उदाहरण** 64 ची दशक स्थानाजवळील अंदाजे किंमत आहे 60.

68 ची दशक स्थानाजवळीलअंदाजे किंमत आहे 70.

65 ची दशक स्थानाजवळील अंदाजे किंमत आहे 70.

$\geq$ 5 ची अंदाजे किंमत पुढील पूर्ण संख्या असते.

$<$ 5 ची अंदाजे किंमत मागील पूर्ण संख्या असत

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 1:**

10च्या जवळील गुण्य व गुणक यांची अंदाजे किंमत काढू. 76 द्व 34 चा गुणाकार करा.

| 10 च्या जवळील अंदाजे किंमत | बरोबर गुणाकार |
|---|---|
| 76 → 80<br>34 → 30<br>80 x 30<br>2400 | 76x 34<br>304<br>2280<br>2584 |

**उदाहरण 2 :**

पहिली संख्या 100 च्या जवळ व दुसरी संख्या 10 च्या जवळील घेऊन 286 द्व 32 या गुणाकाराची अंदाजे किमत काढा.

| 10, 100 च्या जवळील अंदाजे किंमत | बरोबर गुणाकार |
|---|---|
| 286 → 300<br>32 → 30<br>300x 30<br>9000 | 286x 32<br>572<br>8580<br>9152 |

**कृती :** दैनंदिन जीवनातील कोणतेही तीन प्रसंग आठवा. जेथे आपण अंदाजे किंमत सांगतो. त्यांची यादी करुन ती खाली लिहा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय 5.6

**I. 10 च्या जवळील गुण्य आणि गुणक यांच्या गुणाकाराची अंदाजे किंमत काढा.**

1) 44 × 39

2) 19 × 21

3) 23 × 28

4) 86 × 53

5) 77 × 62

**II. गुण्यची 100 च्या जवळील व गुणकाची 10 च्या जवळील गुणाकाराची अंदाजे किंमत काढा.**

1) 308 × 17

2) 240 × 42

3) 195 × 34

4) 335 × 23

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# प्रकरण–6

# भागाकार

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही :–**

- गट करून भागाकार करू शकता.
- बिंदूचा उपयोग करून भागाकार करू शकता.
- पुनरावर्तीत वजाबाकी वापरून भागाकार करू शकता.
- गुणाकार व भागाकाराची तुलना करू शकता.
- एक अंकी भाजकाने भागून बाकी शिल्लक राहून भाज्याला आपण भागू शकता.
- एक अंकी भाजकाने भागून बाकी शिल्लक राहून भाज्याला आपण भागू शकतो.
- दैनंदिन जीवनातील उदाहरणे आपण सोडवू शकतो.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## समान गट करून भागाकार करणे

**कृती :** करणकडे 12 चेंडू आहेत. तो आपल्या चार मित्रांना राम, गोपाळ, अशोक आणि राजू यांना समान चेंडू वाटू इच्छितो. तर प्रत्येकाला किती चेंडू मिळतील ते शोधा.

करणकडे असलेल्या चेंडूंचे निरीक्षण करा.



चार मित्रांना समान चेंडू वाटण्यासाठी तुम्ही मदत करू शकाल?

त्याने प्रत्येक मित्राला एक एक चेंडू दिला. चेंडू दिल्यानंतर त्यांच्याकडे किती चेंडू शिल्लक राहिले?

| राम | गोपाल | अशोक | राजू | करणकडे शिल्लक असलेले चेंडू |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |

प्रत्येक मित्राला तो दुसऱ्या वेळी 1 चेंडू देऊ शकतो का? करणकडे शिल्लक असलेले चेंडू किती?

| राम | गोपाल | अशोक | राजू | करणकडे शिल्लक असलेले चेंडू |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |

आणखी एकदा तो प्रत्येक मित्राला 1 चेंडू देऊ शकतो का? करणकडे आता किती चेंडू शिल्लक राहिले? विचार करा.

| राम | गोपाल | अशोक | राजू | करणकडे शिल्लक असलेले चेंडू |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  | नाही |

आता, करणच्या प्रत्येक मित्राकडे 3 चेंडू असतील.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

म्हणून, 12 चेंडू, 4 गट पाडून प्रत्येक गटाला 3 चेंडू वाटले.

'÷' चिन्ह वापरून आपण $12 \div 4 = 3$ असे लिहू शकतो.

**म्हणूनच, वाटणे किंवा वर्गीकरण करणे यालाचे भागाकार म्हणतात.**

**उदाहरण 1:** चार मित्रांनी आंब्याच्या बागेतील 32 आंबे काढले आहेत. तर ते आंबे सर्वांना समान वाटायचे असतील तर प्रत्येकाला मिळणारे आंबे किती?





| | | |
|---|---|---|
| एकूण मित्र | = | 4 |
| वाटायचे एकूण आंबे | = | 32 |
| प्रत्यके मित्राला मिळणारे एकूण आंबे | = | $32 \div 4 = 8$ |

**बिंदूंचा उपयोग करून भागाकार**

**कृती : बास्केटमध्ये 16 फुले आहेत. दोन गटात समान फुले वाटा.**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वरील उदाहरणात प्रत्येक फुल म्हणजे 1 बिंदू माना.

आता, आपण किती बिंदू घ्यायला पाहिजे?



दोन गटात वरील बिंदू तुम्ही मांडू शकता का? प्रयत्न करा.



प्रत्येक गटात 8 बिंदू आहेत, होय कि नाही?

ही मांडणी आपण भागाकाराच्या स्वरूपात कशी माडं शकतो?

म्हणनू , 16 ÷ 2 = 8

**उदाहरण 1:**

एका बॉक्समध्ये 15 चॉकलेट आहेत. 3 समान गटात ती वाटा. प्रत्येक गटाला किती चॉकलेट मिळाले?

15 चौकलटे चे 15 बिंदू घेतले



हे बिंदू तीन समान गटात मांडू शकता का? प्रयत्न करा.

3 समान गटात हे बिंदू मांडा.



प्रत्येक गटाला मिळालेले चॉकलेट =__________

तुम्ही भागाकाराच्या स्वरूपात कसे लिहाल?

| |
|---|
| समान संख्येची पुनरावर्तीत वजाबाकी म्हणजेच भागाकार होय . किंवा वजाबाकीचे सामान्य स्वरूप म्हणजे भागाकार होय. |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कृती :** राधाच्या वडीलांनी 20 गोष्टीची पुस्तके विकत घेतली. जर तिने दिवसाला 5 पुस्तके वाचली, तर ती किती दिवसात सर्व पुस्तके वाचून संपवील?



20 पुस्तके वाचण्यासाठी राधाला किती दिवस लागतील हे शोधून काढण्यासाठी तिला मदत कराल का?

ती दिवसाला 5 पुस्तके वाचेल.

एक दिवसानंतर न वाचता राहीलेली पुस्तके

20 − 5 = 15

दुसऱ्या दिवसानंतर न वाचता राहिलेली पुस्तके

15 − 5 = 10

तिसरा दिवस पूर्ण केल्यानंतर न वाचता राहिलेली पुस्तके

10 − 5 = 5

चौथ्या दिवसानंतर न वाचता राहिलेली पुस्तके

5 − 5 = 0

चौथ्या दिवसानंतर काही पुस्तके वाचण्याची राहिली आहेत का?

वरील उदाहरणावरून आपण वजाबाकी व भागाकार यांच्यात संबंध आहे हे शिकलो आहोत.

**दिलेल्या समान संख्येची पुनरावर्तीत वजाबाकी म्हणजे भागाकार होय.**

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय 6.1

**I.** **पुनरावर्तीत वजाबाकीने खालील भागाकार करा.**

उदाहरण

| | | |
|---|---|---|
| 20 | ÷ 4 = | ☐ |
| 20 | - 4 = | 16 |
| 16 | - 4 = | 12 |
| 12 | - 4 = | 8 |
| 8 | - 4 = | 4 |
| 4 | - 4 = | 0 |
| ∴ 20 | ÷ 4 = | 5 |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**1)**

| | | |
|---|---|---|
| 18 | ÷ 3 = | ☐ |
| 18 | - 3 = | ☐ |
| ☐ | - 3 = | ☐ |
| ☐ | - 3 = | ☐ |
| ☐ | - 3 = | ☐ |
| ☐ | - 3 = | ☐ |
| ☐ | - 3 = | ☐ |
| ∴ 18 | ÷ 3 = | ☐ |

**2)**

| | | |
|---|---|---|
| 25 | ÷ 5 = | ☐ |
| 25 | - 5 = | ☐ |
| ☐ | - 5 = | ☐ |
| ☐ | - 5 = | ☐ |
| ☐ | - 5 = | ☐ |
| ☐ | - 5 = | 0 |
| ∴ 25 | ÷ 5 = | ☐ |

## गुणाकार आणि भागाकार यामधील संबंध

**उदाहरण 1:** आकृतीचे निरीक्षण करा.



आकृती : (a)

आकृतीचे निरीक्षण करून आकृती (a) मध्ये असलेल्या चांदण्या मोजा. एकूण पंक्ती आणि प्रत्येक पंक्तीत असलेल्या चांदण्याचे निरीक्षण करा.

20 चांदण्या 4 समान पंक्तीत असून प्रत्येक पंक्तीत 5 चादंण्या आहेत.

हे गुणाकार व भागाकार स्वरूपात मांडू शकतो का?

गुणाकार स्वरूपात $4\times5=20$

भागाकार स्वरूपात $20\div4=5$

आकृती (b) चे निरीक्षण करा.



आकृती (b)

20 चांदण्या 4 समान स्तंभात असून प्रत्येक स्तंभात 5 चांदण्या आहेत.

हे गुणाकार व भागाकार या स्वरूपात खालीलप्रमाणे मांडता येईल काय?

$5 \times 4 = 20$ गुणाकाराचे अवयव

$20 \div 5 = 4$ भागाकाराचे अवयव

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**टीप :** गुणाकारात दोन संख्यांचा गुणाकार करतो. तर भागाकारात एक संख्या व गुणाकार दिला तर राहिलेली संख्या काढता येते.

**उदाहरण 2:** मधील भागाकाराचे अवयव काढा. $6 \times 8 = 48$

भागाकाराचे दोन अवयव आहेत. $48 \div 6 = 8$

आणि $48 \div 8 = 6$

## खाली दिलेल्या उदाहरणात भागाकाराचे अवयव लिहा.

**उदाहरण** : 8×5= 40 → 40 ÷ 8 = 5 ; 40 ÷ 5 = 8

1) 7 × 3 = ☐ → ☐ ; ☐

2) 6 × 9 = ☐ → ☐ ; ☐

3) 5 × 4 = ☐ → ☐ ; ☐

4) 8 × 9 = ☐ → ☐ ; ☐

5) 3 × 6 = ☐ → ☐ ; ☐

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## बाकी न उरता संख्येला एक अंकी संख्येने भाग देणे –

तुम्ही या अगोदरच भागाकार शिकला आहात. आठवा 28÷4=7

याचप्रमाणे तुम्ही मोठ्या संख्यांना भाग देऊ शकाल?

4 आईस्क्रीमच्या काड्यापासून एक चौरस बनवायला विद्यार्थ्यांना सांगितले. तर 148 आईस्क्रीमच्या काड्या वापरून विद्यार्थी किती चौरस बनवतील?

```
          भाज्य
            ↑
भाजक ← 4)148(37 → भागाकार
          12↓
          ---
           28
           28
          ---
            0 → बाकी
```



**पायरी 1:** 1 < 4 म्हणून 2 अंक घेऊन 14 ला 4 ने भागा 4×3=12
3 - भागाकार लिहा आणि वजाबाकी करा 14-12 = 2
2 ही बाकी लिहा.

**पायरी 2 :** 8 हे 2 च्या पुढे घ्या 28 सुटे ला 4 ने भागा 4×7=28
7 भागाकार लिह आणि 28-28=0 बाकी 0 लिहा

**लक्षात ठेवा :**

- ज्या संख्येला आपण भागतो या संख्येला भाज्य म्हणतात
- भाज्याला ज्या संख्येने भागतो त्या संख्येला भाजक म्हणतात
- भागाकाराच्या उत्तराला भागाकार म्हणतात
- वजाबाकीच्या उत्तराला बाकी म्हणतात
- बाकी ही नेहमी भाजका पेक्षा लहान असते.

**उदाहरण 1:** 7434 ÷ 6 भाग

| | |
|---|---|
| 6) 7434 (1239<br>6<br>14<br>12<br>23<br>18<br>54<br>54<br>0 | या ठिकाणी 6 भाजक आहे.<br>7434 ही संख्या भाज्य आहे.<br>1239 ही संख्या भागाकार आहे.<br>0 ही बाकी आहे. |

**उदाहरण 2:** 8428 ला 7 ने भाग

```
7) 8 4 2 8 (1204
   7
   14
   14
   002
     0
    28
    28
    00
```

**पायरी 1:** :8 सहस्रला 7 ने भागा. 7×1=7, भागाकारात 1 लिहून वजाबाकी 8-7=1, बाकी 1 लिहा.

**पायरी 2 :** :4 शतक 1 पुढे आणून 14 शतकला 7 ने भागा. 7×2=14 भागाकारात 2 लिहून वजाबाकी 14-14=0 करा. बाकी 0(शून्य) लिहा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**पायरी 3:** 2 दशक 0 च्या पुढे आणा.

7 हे 2 पेक्षा मोठे आहेत, 7×0=0, 0 हे 2 पेक्षा लहान आहेत.

भागाकार 0 येतो.तो भागाकाराच्या तिसऱ्या अंकात लिहा.

वजाबाकी 2−0=2 करा. बाकी 2 लिहा.

**पायरी 4:** 8 सुटे 2 च्या पुढे आणा.

28 सुटेला 7 ने भागा. 7×4=28,

4 हे भागाकाराच्या पुढील स्थानी लिहा.

वजाबाकी 28−28=0 करा

बाकी 0 लिहा.

**उदाहरण 3:** 5 शाळांमध्ये 1735 पुस्तके समान वाटायची आहते . तर प्रत्येक शाळेला किती पुस्तके मिळाली हे शोधा?

एकूण पुस्तके = 1735

एकूण शाळा = 5

प्रत्येक शाळेला मिळालेली पुस्तके = 347

```
5)1735(347
  15↓
   23
   20↓
   035
    35
    00
```

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय 6.2

### I. रिकाम्या जागा भरा.

1) 42 ÷ 6 = ______________

2) 24 ÷ 8 = 3 मध्ये भाज्य ______________ आहे

3) 45 ÷ 9 = 5 '9' हे ______________ आहेत

4) 72 ÷ 8, मध्ये _____ हा भागाकार आणि ___________ ही बाकी आहे

## II. भागा :

a) 2) 88 (

b) 7) 91 (

c) 5) 850 (

d) 6) 792 (

e) 4)8464 (

f) 9) 9567 (

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## III. सोडवा :

1) 4 विद्यार्थी एका बेंचवर बसतात. 64 विद्यार्थ्यांना बसण्यासाठी किती बेंचची गरज आहे?

2) 240 मेणबत्त्या समान चार बॉक्समध्ये ठेवल्या आहेत . प्रत्येक बॉक्समधील मेणबत्त्यांची संख्या काढा.

3) 255 विद्यार्थी सहलीला गेले. त्यांनी 5 बसमधून प्रवास केला. तर प्रत्येक बसमध्ये किती विद्यार्थी होते?

4) एक आगगाडी 6 तासात 672 कि.मी. अंतर जाते. तर ती 1 तासात सरासरी किती अंतर जाईल ?

5) एक कामगार एका आठवड्याला ₹ 952 मिळवितो. तर त्याचे दिवसाचे उत्पन्न किती?

6) स्वातंत्र्य दिनादिवशी प्रत्येक विद्यार्थ्याला 3 चॉकलेटस् दिली. जर सर्वांना मिळून 246 चॉकलेटस् दिली. तर किती विद्यार्थ्यांना चॉकलेटस् मिळाली?

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## भाज्य ला 1 अंकी संख्येने भागले असता मिळणारी बाकी :–

संख्येला भाग देण्याची क्रिया तुम्ही या अगोदर शिकला आहात.
रवी आपल्या चार मित्रांना 9 लाडू प्रत्येकी समान वाटू शकेल काय?

```
4)9(2
  8
  1 ←——— बाकी
```

प्रत्येक मित्राला किती लाडू मिळतील? वाटल्यानंतर किती लाडू शिल्लक राहीले?

समान लाडू वाटल्यानंतर रवीकडे जे लाडू शिल्लक राहीले ती म्हणजचे बाकी होय.

**टीप : भाजक पेक्षा बाकी ही लहान असते.**
सुत्र वापरून उत्तर तपासू शकतो.
भागाकार × भाजक + बाकी = भाज्य
वरील उदाहरणात $(2\times4)+1=9$

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**उदाहरण 1 :** 86 ला 5 ने भागा. भागाकार आणि बाकी शोधा.

```
5)86(17
  5
  36
  35
  01 ←—— बाकी
```

**पायरी 1:** 8 दशकला 5 ने भागा. $5\times1=5$, भागाकारात 1 अंक लिहा. वजाबाकी $8-5=3$ करा. 3 ही बाकी लिहा.

**पायरी 2:** 3 च्या पुढे 6 सुटे आणा. 36 सुट्याला 5 ने भागा. $5\times7=35$ भागाकारात 7 हा दुसरा अंक लिहा. वजाबाकी $36-35=1$ करा.
1 ही बाकी लिहा.

## स्वाध्याय 6.3

**I. खालील प्रत्येक उदाहरणातील भागाकार आणि बाकी लिहा.**

1) 6) 76 (

भागाकार =

बाकी =

2) 8) 93 (

भागाकार =

शेष =

3) 5) 345 (

भागाकार =

शेष =

4) 6) 911 (

भागाकार =

बाकी =

5) 8) 9254 (

भागाकार =

बाकी =

6) 5) 8374 (

भागाकार =

बाकी =

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

7) 5) 2437 (

भागाकार =

बाकी =

8) 7) 6218 (

भागाकार =

बाकी =

9) 6) 3452 (

भागाकार =

बाकी =

10) 8) 5715 (

भागाकार =

बाकी =

11) 4) 2375 (

भागाकार =

बाकी =

12) 7) 4238 (

भागाकार =

बाकी =

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**एकापेक्षा जास्त मुलभूत क्रिया असलेली सोडविलेली उदाहरणे :–**

**लक्षात ठेवा: –** बेरीज (+), वजाबाकी (–), गुणाकार (×) व भागाकार (÷) या मूलभूत क्रिया आहेत.

चार मूलभूत क्रिया गणितात वेगवेगळ्या कशा वापरतात हे आपणाला माहीत आहे. आता आम्ही दोन किंवा दोनापेक्षा जास्त मूलभूत क्रिया असलेली उदाहरणे सोडवू.

**उदाहरण 1:**

रघु प्रत्येक महिन्याला ₹ 8000 मिळवितो. तो ₹ 2000 घरभाडे, ₹ 3500 धान्य आणि कपड्यासाठी ₹ 1000 खर्च करतो. राहिलेली रक्कम तो बचत करतो. तो किती बचत करतो?

| | |
|---|---|
| महिन्याची कमाई = ₹ 8000 | खर्च |
| महिन्याचा एकूण खर्च = ₹ 6500 | घरभाडे ₹ 2000 |
| ∴ एकूण बचत ₹ 1500 | धान्य ₹ 3500 |
| | कपडे ₹ 1000 |
| | एकूण खर्च ₹ 6500 |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 2:**

सविताने 25 कि.ग्रॅम आंबे ₹ 12 प्रति कि.ग्रॅम याप्रमाणे विकले. त्या रकमेतून तिने 10 कि.ग्रॅम तांदूळ विकत घेतले. तर तांदळाच्या 1 कि.ग्रॅम ची किंमत काढा.

1 कि.ग्रॅम आंब्याची किंमत ₹ 12

∴ 25 कि.ग्रॅम आब्याची किंमत = $\frac{25 \times 12}{300}$

∴ 10 कि.ग्रॅम तांदूळाची किंमत = ₹ 300

1 कि.ग्रॅम तांदूळची किंमत = ₹ 300 ÷ 10

= ₹ 30

```
10) 300 (30
    30
    000
     00
     00
```

## स्वाध्याय 6.4

1) पूजा ₹ 2300 किंमतीचे मिक्सर आणि ₹ 1750 किंमतीचे कुकर खरेदी करू इच्छिते. जर तिच्याकडे ₹ 3500 असतील तर वरील वस्तू खरेदी करण्यासाठी अजून तिला किती रूपये पाहीजेत ?

2) गव्हाच्या 9 पिशव्याची किंमत ₹ 4050 आहे. तर 21गव्हाच्या पिशव्याची किमत किती?

3) जर 520 पुस्तके 4 कप्प्यात ठेवली आहेत. अशा 32 कप्प्यात किती पुस्तके ठेवता येतील?

4) एका पुस्तकाची किंमत ₹15 आणि एका पेन्सिलची किंमत ₹4 आहे. मोहन 2 पुस्तके व 3 पेन्सिल विकत घेऊ इच्छितो. दोन्हींना मिळून त्याला किती रूपये द्यावे लागतील?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण–7

# वर्तुळ

U7G5B2

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही :**

- साहित्याचा वापर न करता वर्तुळ काढता येईल.
- कंपास वापरून वर्तुळ काढू शकाल.
- वर्तुळाचे केंद्र, त्रिज्या आणि व्यास ओळखू शकाल.

वर्तुळाच्या आकारासारख्या दिसणाऱ्या वस्तूंची माहिती तुम्ही मागील इयत्तेत शिकला आहात.

तुमच्या दैनंदिन जीवनात दिसणाऱ्या वर्तुळाच्या आकारासारख्या दिसणाऱ्या वस्तूंची यादी तयार करा.

**उदाहरण :** 1) काचेच्या बांगड्या

2) ........................................

3) ........................................

4) ........................................

**कृती:** स्थिर पाणी असलेल्या डबक्यात एक लहान दगड टाका. तयार झालेल्या लाटांचे निरिक्षण करा. त्या लाटा कोणत्या आकारासारख्या दिसतात?

आता, वर्तुळाचा आकार तुम्हाला माहित आहेच तर वर्तुळ कसे काढतात? विचार करा.

## वर्तुळाची रचना

बांगडी घ्या. यापासून वर्तुळ काढता येते का? प्रयत्न करा.



*आकृती – 1*



*आकृती – 1*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आकृतीत दाखविल्याप्रमाणे पेपरवर एक बांगडी ठेवा.

1) आकृतीत दाखविल्याप्रमाणे बांगडीच्या भोवती पेन्सिलचा उपयोग करून मार्क करा.

2) बांगडी बाजूला काढा. आता कोणता आकार मिळाला?

हे वर्तुळ आहे.

दररोज कोणत्या वेगवेगळ्या वस्तू पाहता ज्यापासून वर्तुळ काढता येते? काही वस्तूंची यादी करा.

1) ........................................................................................................

2) ........................................................................................................

3) ........................................................................................................

4) ........................................................................................................

**वर यादी केलेल्या वस्तूपासून खाली दिलेल्या मोकळ्या जागेत वर्तुळ काढा.**

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**दिलेले बिंदू जोडा. कोणता आकार मिळाला? निरिक्षण करा.**



तुमच्याकडील कंपास उघडा. कोणत्या उपकरणाने वर्तुळ काढता येते? विचार करा.

**कंपास (कैवार) वापरून वर्तुळ काढण्याची कृती –**

- आकृतीत दाखविल्याप्रमाणे कंपासमध्ये पेन्सिल बसवा.कंपास टोक व पेन्सिल यामध्ये काही अंतर घ्या.



- कंपास टोक कागदावर ठेवा.



- पेन्सिल पेपरवर स्पर्श करून कंपास असा फिरवा

  की एक पूर्ण फेरा होऊ दे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आता कोणता आकार मिळाला.

हा वर्तुळाचा आकार आहे.

अशाप्रकारे कंपास वापरून वर्तुळ काढता येते .

धातूचे किंवा कंपासचे टोक ज्या ठिकाणी ठेवतो त्याला काय म्हणतात? विचार करा.?



हा वर्तुळाचा केंद्र आहे. या आकृतीत '0' हा वर्तुळाचा केंद्र आहे.

**टीप :**



- कंपासचे टोक अतिशय तिक्ष्ण असते म्हणून ते काळजीपूर्वक हाताळा.
- कंपासमध्ये पेन्सिल बसविल्यानंतर कंपास टोक आणि पेन्सिलचे टोक एकत्र आणून एका समान रेषेवर आहेत की नाहीत ते तपासा.
- कंपासचे टोक व पेन्सिलचे टोक स्थिर ठेवा जोपर्यंत एक फेरा पूर्ण होईल. पुस्तक गोल फिरवू नका.

**कृती :** तुमच्या कंपास पेटीतील कंपास न वापरता कोणते दुसरे उपकरण वापरून वर्तुळ काढता येते? प्रयत्न करा. तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करून समजावून घ्या.

## स्वाध्याय 7.1

**I.** **वर्तुळाचे 'A' हे वर्तुळ केंद्र मानून वर्तुळ काढा.**

· **A**

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

II. खाली दिल्याप्रमाणे वर्तुळ केंद्र C व वर्तुळ केंद्र D घेऊन अशी वर्तुळे काढा कि ती एकमेकांना छेदणार नाहीत.

· C

· D

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

III. खाली दिलेल्या जागेतच मोठे वर्तुळ काढा.

**कृती:** मध्य बिंदू घेऊन किती वर्तुळे काढता येतात? विचार करा. प्रयत्न करा.

## वर्तुळाची त्रिज्या

### वर्तुळ काढा.




वर्तुळावर A, B, C, आणि D बिंदू आकृतीत दाखविल्याप्रमाणे घ्या. '0' पासून A, B, C व D या बिंदूपर्यंतचे अंतर मोजा.

OA = ...................................... सें.मी

OB = ...................................... सें.मी

OC = ...................................... सें.मी

OD = ...................................... सें.मी

याचप्रमाणे वर्तुळावर आणखी काही बिंदू काढून त्यांचे '0' पासून अंतर मोजा. तुमचे काय अनुमान आहे?

वर्तुळावरील सर्व बिंदू वर्तुळकेंद्रापासून समान अंतरावर आहेत.

OA, OB, OC, आणि OD यांना काय म्हणतात? त्यांना वर्तुळाच्या त्रिज्या म्हणतात.

**कृती:**

एक वर्तुळ काढा. त्या वर्तुळाला किती त्रिज्या काढता येतात? त्या काढा. यावरून तुम्हाला काय समजले? तुमचे अनुमान काय?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## वर्तुळाचा व्यास

### पुढील आकृतीचे निरीक्षण करा.




A, B, C, आणि D हे बिंदू कोठे आहेत? ते सर्व वर्तुळावर आहेत.

A आणि B जोडा त्याचप्रमाणे C आणि D जोडा.

कोणत्या बिंदूमधून AB व CD गेलेले आहेत. निरीक्षण करा.

ते वर्तुळाच्या वर्तुळकेंद्रापासून गेलेले आहेत.

त्यांना वर्तुळांचा व्यास असे म्हणतात.

AB आणि CD हे वर्तुळाचे व्यास आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @MTBS

**कृती :**

एक वर्तुळ काढा. या वर्तुळात किती व्यास काढता येतात? ते काढा. तुम्ही काढलेल्या व्यासांची लांबी मोजा. यावरून तुम्हाला काय समजले? तुमचे अनुमान काय?

**समजून घ्या :**

- व्यास वर्तुळाचे दोन समान भाग करतो.
- वर्तुळातील कोणतेही दोन व्यास ज्या बिंदूमध्ये छेदतात. तो बिंदू म्हणजे वर्तुळाचा केंद्रबिंदू असतो.

**कृती :**

कंपास न वापरता जेव्हा वर्तुळ काढतात तेव्हा वर्तुळाचे केंद्र, त्रिज्या व व्यास कसे ओळखावेत? विचार करा.

पेपर घडी घालण्याच्या पद्धतीने तुमच्या शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली हे समजावून घ्या.

## स्वाध्याय 7.2

| | | |
|---|---|---|
| 1) |  | या वर्तुळाला त्रिज्या काढा. |
| 2) |  | या वर्तुळाला व्यास काढा. |
| 3) |  | निरीक्षण करून खालील रिकाम्या जागा भरा.<br>a) वर्तुळाचा वर्तुळ केंद्र .........................<br>b) त्रिज्या .....................................<br>c) व्यास ...................................<br>d) वर्तुळाला काढलेल्या त्रिज्यांची संख्या ................ |

**कृती :**

क्रिडांगणात एक मोठे वर्तुळ काढा. ते काढण्यासाठी कोणती पद्धत वापराल? तुमच्या शिक्षकाबरोबर चर्चा करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-8

# बौद्धिक अंकगणित

U9J7P8

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही :**

- 10 आणि 100 च्या पटीतील बेरीज मनाने कराल.
- 10 आणि 100 च्या पटीतील वजाबाकी मनाने कराल.
- दोन संख्याचा गुणाकार अंशतः गुणाकाराने काढाल.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

दररोजच्या जीवनामध्ये काही प्रसंगी काही उदाहरणे आपण तोंडी करतो.

**उदाहरण :** 1) एका महिन्याचे गवळ्याचे बील देताना.

2) फेरीवाल्याकडून सुटे पैसे घेताना.

3) ग्रुपमध्ये समान पैसे वाटताना. इत्यादी.

**यासारखे दोन प्रसंग विचार करा आणि लिहा.**

1) ..............................................................

..............................................................

2) ..............................................................

..............................................................

जेव्हा तोंडी गणिते सोडवितो. तेव्हा आम्ही वेगवेगळ्या पद्धती वापरतो.

**उदाहरण 1:** 60 ला 50 च्या स्वरुपात लिहा

**पायरी 1:** 60 मध्ये 50+10 बेरीज करा.

म्हणून 50+50+10

50+50+10=110

**पद्धत 2:** 60 ची मांडणी 30+30 करा.
30+30 मध्ये 50 बेरीज करा.

80+30=110

**पद्धत 3:** दशक स्थान अंकाची बेरीज करा ती 5+6=11

नंतर सुटे स्थानी 0(शून्य) त्याचप्रमाणे ठेवा.

50+60=110

यासारखी उदाहरणे तोंडी करताना कोणता फायदा होतो? तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा आणि यादी करा.

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

मनाने उदाहरणे सोडविण्याच्या पद्धती माहीत असतील तर तुमच्या मित्र व शिक्षकाबरोबर चर्चा करा.

बेरीज, गुणाकार व भागाकारामध्ये बौद्धीक गणित वापरतात. विचार करा आणि काही प्रसंग लिहा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

### उदाहरण 2:

शिक्षक : सुरेश हे उदाहरण कर.

विद्या : मी हे करू शकतो.

शिक्षक : प्रथम उत्तर कोण देतो ते मी पाहतो.

40+20





| शंभर | दहा | सुटे |
|---|---|---|
| | 4 | 0 |
| | 2 | 0 |
| | 6 | 0 |

विद्याने लगेच उत्तर दिले.

उत्तर : 60

शिक्षक : विद्या तू हे कसे केलीस?

विद्या माझ्या मनाने मी हे केले.

नंतर सुरेशने उत्तर सांगितले 60 मी उदाहरण वहीमध्ये लिहून स्थानमूल्य तक्त्यानुसार बेरीज केली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रथम मी 20 ची 10 + 10 अशी मांडणी केली नंतर 40 मध्ये 10 मिळविले 50 मिळाले. नंतर मी राहिलेले 10 आणि 50 यांची बेरीज केली 60 मिळाले.

म्हणूनच मनाने सोडविलेल्या उदाहरणांना 'बौद्धीक उदाहरणे' असे म्हणतात.

हे उदाहरण दुसऱ्या पद्धतीने सोडविता येते.

40 + 20
(4+2) (0+0)
60

1) मनाने दशक स्थानातील अंकाची बेरीज करा.
2) शून्य सुटे स्थानामध्ये आहे तसा ठेवा.
3) 60 हे उत्तर मिळाले.

## बौद्धीक बेरीज

**10, 100 ची बौद्धीक बेरीज –**

उदाहरण 3 : रविकडे 40 आंबे आणि राखीकडे 30 आंबे आहेत .
तर त्याच्याकडे एकूण किती आंबे आहेत?



**पायरी 1:**

**1) 40 + 30 ची बेरीज**

| द | सु |
|---|---|
| 4 | 0 |
| 3 | 0 |
| 7 | 0 |

1) 4 दशक आणि 3 दशक यांची बेरीज 7 दशक येते.

2) हे 70 असे लिहितात.

जर सुटे स्थानातील अंक शून्य (0) असतील दशक स्थानातील अंकाची बेरीज करावी आणि सुटे स्थानात 2(शून्य) आहे तसे ठेवावेत.

एकूण आंबे आहेत = 70

**पायरी 2:** रवीकडे 40 आंबे, राखीकडे 30 आंबे, मनाने 30 ची मांडणी 10+10+10 करा

प्रथम 10 व 40 ची बेरीज 50 येते.

10 व 50 ची बेरीज 60 येते.

10 व 60 ची बेरीज 70 येते

40 + 10 + 10 + 10 =70

**मनाने सोडविण्याचा प्रयत्न करा.**

1)



50 मिली लीटर



20 मिली लीटर

50 + 20,

_______ मिली लीटर

2) रमेशने आठवडी बाजाराला जाऊन पुढे दाखविल्याप्रमाणे भाज्या आणल्या.



भेंडी

1 कि.ग्रॅ. = ₹30



टोमॅटो

1 कि.ग्रॅ. = ₹50

रमेशने एकूण किती रूपये दुकानदाराला दिले? ₹--------------

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) रिनाने 2 साबण दूकानातून विकत घेतले




\+




रिनाने दुकानदाराला दिलेली एकूण किंमत ₹...............................

**4) पुढील उदाहरणे करा.**

| | |
|---|---|
| a) |  |
| b) |  |
| c) |  |
| d) |  |



**5) दिलेल्या अंकांचा उपयोग करून कोणत्याही दिशेने बेरीज केली असता उत्तर समान येईल, अशाप्रकारे रिकाम्या जागा भरा.**

| | | |
|---|---|---|
| 10 | | |
| | 20 | |
| | | 30 |

NOT TO BE REPUBLISHED ©MSCERT

6) वेणूने रांगोळीचा साचा ₹ 30 ला घेतला. भास्करने दुसरा एक ₹ 40 ला घेतला. त्यांनी एकूण किती किंमत दिली?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

7) शिलाने जत्रेत सशाचे खेळणे ₹ 50 ला व ड्रमचे खेळणे ₹ 30 ला घेतले. तिने खेळण्यासाठी एकूण किती खर्च केले?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 4:** 1) 23+20 ची बेरीज

**पद्धत 1 :** 20 ची मांडणी 10+10 (2 दशक बनवा)

23+10 ची बेरीज करा

23+10=33

33 व 10 ची बेरीज 33+10=43 मिळतात

**पद्धत 2:** 23 ची मांडणी 20+3

20 + 3 + 20

40 + 3 = 43

2) 47+30 ची बेरीज

**पद्धत 1:** 47 ची मांडणी 40 + 7 (4 शतक + 7 सुटे)

40 + 7 + 30

70 + 7 = 77

**पद्धत 2:**

47+30 ची मांडणी 3 दशक करा (मनाने 30=10+10+10)

47+10+10+10

57+10+10

67+10

=77

3) रिटा आणि पिटरने प्रोजेक्ट (कृती) चे पुस्तक ₹ 75 आणि पेन ₹10 ला पुस्तकाच्या दुकानातून घेतले. तर त्यांनी एकूण किती रूपये खर्च केले?

___

___

___

___

**उदाहरण 5:** 32 + 45 बेरीज करा

**पद्धत 1:** (30 + 2) + (40 + 5)

30 + 40 + 2 + 5

70 + 7

=77

| श | द | सु |
|---|---|---|
| | 3 | 2 |
| | 4 | 5 |



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1) 32 ची मांडणी (30+2) करा.

2) 45 ची मांडणी (40+5) करा.

3) प्रथम 3 दशक व 4 दशकची बेरीज 7 दशक येते. त्याचप्रमाणे 2 सुटे आणि 5 सुटे यांची बेरीज 7 सुटे येते.

4) 7 सुटे व 7 दशक यांची बेरीज 77 येते.

**पद्धत 2 :** 32 + 45 (45 = 10+10+10+10+5)

32+10+10+10+10+5

42+10+10+10+5

52+10+10+5

62+10+5

72+5

77

**उदाहरण 6:** 1) 53+37 बेरीज करा.

**पद्धत 1:** 53 मध्ये 5 दशक आणि 3 सुटे

37 मध्य 3 दशक आणि 7 सुटे

8 दशक 10 सुटे

53+37 → 80+10 → = 90

**पद्धत 2:** 5 3 + 3 7

(5+3) दशक +(3+7) सुटे

8 दशक + 10 सुटे

80+10=90

NOT TO BE REPUBLISHED
@KTBS

2) 62+26 ची बेरीज करा.

**पद्धत 1:**

62 → 60 + 2

26 → 20 + 6

प्रथम दशकांची बेरीज 60+20=80

नंतर सुटेची बेरीज 2+6=8

80 + 8 = 88

**पद्धत 2:** 26 +62 ची बेरीज करा.

26 ची मांडणी 10 + 10 + 6 करा आता त्यांची बेरीज 62 बरोबर खालीलप्रमाणे करा.

62 + 10 + 10 + 6

72 + 10 + 6

82 + 6

88

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

3) कावेरीम्माने घरात 40 बकरी, 20 गाई आणि 10 बैल पाळले आहेत. तर तिने एकूण किती गुरे घरी पाळली आहेत?

या सारखे अनेक प्रसंग तुम्हाला येतात. दररोजच्या जीवनातील या प्रकारचे दोन प्रसंग लिहा. या प्रसंगी उत्तर कसे शोधता ते सांगा.

**उदाहरण :** रहीमने 30 लिटर दूध सोमवारी आणि मंगळवारी 20 लिटर दूध डेअरीला पाठविले. तर त्याने दोन दिवसात एकूण किती दूध पाठविले?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

| |
|---|
| |
| |
| |

**I. योग्य उत्तराने रिकाम्या जागा भरा.**

1) 26 + 40 = __________ 2) 20 + 33 = __________

3) 53 + 30 = __________ 4) 72 + 10 = __________

**II. पुढील उदाहरणे मनाने (तोंडी) सोडवून त्यांचे उत्तर दिलेल्या जागेत लिहा.**

1) 45 + 23 = __________

2) 33 + 25 = __________

3) 45 + 43 = __________

4) 85 + 22 = __________

5) 68 + 21 = __________

6) 55 + 45 = __________

7) 33 + 45 = __________

8) 46 + 51 = __________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## III. तोंडी करा.

1) 10 + 20 + 30 = ______

2) 20 + 20 + 10 = ______

3) 50 + 30 + 10 = ______

4) 40 + 30 + 20 = ______

### 300 + 200 ची बेरीज

| श | द | सु |
|---|---|---|
| 3 | 0 | 0 |
| 2 | 0 | 0 |
| 5 | 0 | 0 |

**पद्धत 1:** 3 शतक व 2 शतकची बेरीज 5 शतक येते.

**पद्धत 2:** सुटे व दशक स्थानातील अंक 0 आहेत.शतक स्थानातील अकंाची बेरीज करून शतक व सुटे स्थानी 0 लिहा.

डोळ्यांची तपासणी केल्यानंतर रिताने उन्हापासून संरक्षण करण्यासाठी ₹ 500 चा चष्मा घेतला. तिने आणखी ₹ 400 चा गॉगल घेतला तर तिला एकूण किती रूपये द्यावे लागतील?



₹ 500



₹ 400

उत्तर : ______

नासीर बेगमने 2 बादल्या घेतल्या. एका बादलीची किंमत ₹ 200 आहे. तर दुसऱ्या बादलीची किंमत ₹ 300 आहे. तर दोन्ही बादल्यासाठी तिला एकूण किती रूपये द्यावे लागतील?



₹ 200



₹ 300

उत्तर : ______

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1) सुनिलने दुकानात 500 वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू ठेवल्या. दुकानाचा विस्तार केल्यानंतर आणखी नवीन 200 वस्तू ठेवल्या. तर त्याच्याकडे एकूण किती वस्तू आहेत?

2) शाळेच्या सहलीसाठी 200 विद्यार्थ्यांनी नावें नोंदविली होती. शेवटच्या तीन दिवसात आणखी 100 विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली. तर सहलीसाठी एकूण किती विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) कलिकाने जानेवारीमध्ये ₹ 200 आणि फेब्रुवारीमध्ये ₹ 700 जमा केले, तर तिने एकूण किती रूपये जमा केले?

## बौद्धीक वजाबाकी

राणीने आपल्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी 25 चॉकलेट विकत आणले. तिने आपल्या मैत्रिणीला 10 चॉकलेट वाटले. तर तिच्याकडे किती चॉकलेट शिल्लक राहिले? हे उदाहरण तोंडी कसे सोडवितात ते पाहू.

**पद्धत 1:**

25 -10

25 ची मांडणी 20+5 होते.

20+5-10 (नंतर 20-10=10)

10+5

= 15

राणीकडे शिल्लक राहिलेली एकण चॉकलेट =15

**पद्धत 2:**

25 ची मांडणी 20+5 होते.

राणीकडे शिल्लक राहिलेली एकण चॉकलेट =15

### 2) 50 मधून 30 वजा करा.




=50-30

=40-10

=30-10

=20

30=10+10+10

### 3) 24 मधून 17 वजा करा.

24 - 17




20 + 4 - 10 - 7

20 - 10 - 7 + 4

10 - 7 + 4

3 + 4

= 7

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**पद्धत 1 :** 24 व 17 ची मांडणी दशक व सुटे मध्ये करा. आता वजाबाकी करा. वजाबाकी करताना मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा करा.

4) 35 — 35 मध्ये 3 दशक आणि 5 सुटे आहेत.

-17 — 17 मध्यें 1 दशक आणि 7 सुटे आहेत.

★ 3 दशकमधून 1 दशक वजा केल्यास 2 दशक मिळतात. (30-10=20)

★ 20 मधून 7 वजा केल्यास 13 मिळतात. (20-7=13)

★ 13 मध्ये 5 मिळवा 18 मिळतात. (13+7) =18







4)




वजाबाकीची पद्धत 64-34

64 मध्यें 6 दशक 4 सुटे = 60+4

34 मध्ये 3 दशक 4 सुट = 30+4

= 30+0

64 मध्ये 34 वजा केल्यास 30 मिळतात.

म्हणजचे 6 दशक मधून 3 दशक वजा केले तर 30 मिळतात ---------①

4 सुटेमधून 4 सुटे वजा केले तर 0 मिळतात. ---------②

समीकरण ① व ② ची बेरीज करून

30+0=30

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**पद्धत 2 :** 64 मधून 10 वजा करा 64-10

64 -10 = 54 (1 ले दशक)

54 -10 = 44 (2 रे दशक)

44 -10 = 34(3 रे दशक)

34 - 4 = 30

34 ची मांडणी 10 + 10 + 10 + 4

शेखराप्पाच्या नर्सरीमध्ये 600 प्रकारची रोपे होती. जास्त पावसामुळे त्यातील 300 रोपे बाद झाली. तर त्याच्याजवळ एकूण किती रोपे शिल्लक राहिली?

600 – 300 = ?

1) सुटे आणि दशक स्थान शून्य आहे. म्हणून शतक स्थानातील अंकाची वजाबाकी करा. 6–3=3 शून्य आहे तसे ठेवा.

आता उत्तर 300 आहे. तुम्ही सुद्धा प्रयत्न करा.

2) उत्तर 300 सहजपणे सांगता येते. होय की नाही?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**तोंडी उदाहरणे सोडविण्याचे फायदे कोणते? विचार करा.**

| |
|---|
| 1) |
| 2) |
| 3) |

**पुढील उदाहरणे तोंडी सोडवून उत्तर लिहा.**

1) रेखाकडे ₹ 40 आहेत. तिने पुस्तक दुकानात जाऊन ₹ 25 चे पुस्तक विकत आणले. तर रेखाकडे किती रूपये शिल्लक राहिले?

2) मेघाने बागेतून 400 कच्चे नारळ विकत आणले. तिने बाजारात त्यातील 100 कच्चे नारळ विकले तर मेघाकडे एकूण किती कच्चे नारळ शिल्लक राहिले?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## 10 च्या पटीत (तोंडी उदाहरणे)

**1) नागवेणी दुधाच्या डेअरीत दररोज 10 लिटर दूध विकते. तर ती 20 दिवसात एकूण किती लिटर दूध विकेल?**

आईने हा प्रश्न मुलांना विचारला. जो प्रथम उत्तर सांगेल त्याला मी बक्षीस देईन. (प्रिया आणि रहीमने उत्तर दिले)




प्रियाने प्रथम उत्तर दिले नंतर रहीमने. तर त्यांनी कोणती पद्धत वापरली.

| | |
|---|---|
| प्रिया :- आई मी मनात गुणाकार केला<br><br>आई:- कसा?<br><br>प्रिया :- 10 लीटर×20<br>दोन संख्यांच्या सुटे स्थानात 2 शून्य आहेत.<br>सुटे स्थानात दाने शून्य लिहा.<br>यानंतर 2 व 1 चा गणुाकार करा.<br>नंतर 2 च्या पुढे 2 शून्य ठेवले.<br>याप्रमाणे 200 उत्तर मिळाले. | रहीम:- मी सामान्य गुणाकार पद्धतीने<br>सोडविले. पुस्तक लिहून 10×20<br><br>10 × 20<br>00<br>20<br>200<br><br>रहीम :- 200 लीटर |

**यावरील काही उदाहरणे पाहू -**

**2) राजूने आपल्या बहिणीच्या लग्नासाठी काही साड्या खरेदी केल्या. प्रत्येक साडीची किंमत ₹ 200 असेल तर अशा 30 साड्यांची किंमत काढा.**

शिक्षक : आता कोण प्रथम सांगेल. ?

जान : सर, मी प्रथम सांगतो.

शिक्षक:- जॉन सांग, तुला उत्तर कसे मिळाले?




पायरी 1: प्रथम मी 200 × 30 मनात घेतले.

पायरी 2: शतक स्थानाला गुण्य 2 ला दशक स्थानातील 3 या गुणकाने गुणले.

उत्तर आहे 6

200 × 30

↓ ↓

गुण्य गुणज

पायरी 3: मी तीन शून्य आहे तसेच लिहिले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**पायरी 4:** 6000

शिक्षक : गणितामध्ये हे गुणाकाराने असे साडेवितात.

$$\frac{200 \times 30}{6000}$$

## तुम्ही सोडवा.

1) संताषने 3 खुर्च्या खरेदी केल्या त्या प्रत्येक खुर्चीची किंमत ₹ 600 आहे. तर 3 खुर्च्यांची किंमत किती?




2) शेतात 10 वाफे आहेत. प्रत्येक वाफ्यात 100 रोपे लावायची आहेत. किती रोपे लागतील?

---

3) एका गुलाबाची किंमत ₹ 7 आहे. 6 मुलींनी प्रत्येकी एक गुलाब विकत घेतला. तर त्यांनी एकूण किती किंमत विकणाऱ्याला द्यावी?




---

---

## मनाने उदाहरणे कशी करतात?

**उदाहरण :5**

एका चॉकलेट बारची किंमत ₹ 25 आहे. अशा 5 चॉकलेट बारची किंमत किती होईल?

$25 \times 5$ $(20 + 5) \times 5$ मनात विचार करून

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

1) 20 ला 5 ने गुणा उत्तर 100 येते.

2) नंतर 5 ने 5 ला गुणून उत्तर 25 येते. 100+25

3) आता 100 आणि 25 यांची बेरीज करा. उत्तर 125 येते.

**I. मनाने उदाहरणे करून रिकाम्या जागा भरा.**

1) $6 \times 5 = 2 \times 5 + \square \times 5$

2) $5 \times 9 = 5 \times 3 + 5 \times \square$

3) $35 \times 6 = 30 \times 6 + 5 \times \square$

**II. मनाने करा. खालील उदाहरणात 2 संख्यांचा गुणाकार अंशतः गुणाकाराने करा.**

1) $3 \times 6 + 3 \times 2 = \diamond + \diamond =$

2) $20 \times 4 + 5 \times 4 = \diamond + \diamond =$

3) $400 \times 2 + 4 \times 2 = \diamond + \diamond =$

**III. खालील उदाहरणे मनाने सोडवा.**

1) शाळेत मध्यान्ह आहारात दररोज 4 कि.ग्रॅम तांदूळ लागतो. तर एका महिन्यातील 30 दिवसाला एकूण किती तांदूळ लागेल?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2) वर्गात 13 डेस्क आहेत. प्रत्येक डेस्कला 4 पाय आहेत तर डेस्कना एकूण किती पाय होतील?

3) एका रेल्वे डब्याला 8 चाके आहेत. अशा 15 रेल्वे डब्याना एकूण किती चाके होतील?

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

4) शुभाने 16 फुलांचे गुच्छ विकत घेतले. प्रत्येक गुच्छयात 9 फुले आहेत. तर एकूण किती फुले त्या गुच्छयात आहेत?

प्रकरण–9

# अपूर्णांक आणि दशाशं अपूर्णांक

A5B9K3

**या प्रकरणाच्या अध्ययनानंतर तुम्ही :**

- अपूर्णांकांचा अर्थ समजेल.
- अपूर्णांकातील अंश व छेद आळे खू शकाल.
- दिलेल्या अपूर्णांकांचा सममूल्य अपूर्णांक शोधू शकाल.
- दशांश अपूर्णांकांचा अर्थ समजावून घ्याल. 0.1, 0.2, 0.3

तुम्ही मागील इयत्तत $\frac{1}{2}, \frac{1}{4}, \frac{3}{4}$ यांचा अर्थ शिकला आहात. काही उदाहरणांचे निरिक्षण करा



$\frac{1}{2}$

आकृतीमधील रेखांकीत केलेला भाग हा

$\frac{1}{2}$ अपूर्णांक दर्शविते. हे एक द्वितीयांश असे वाचतात.



$\frac{1}{4}$

आकृतीमधील रेखांकित केलेला भाग
हा $\frac{1}{4}$ अपूर्णांक दर्शविते.
हे एक चतुर्थांश असे वाचतात.



$\frac{3}{4}$

आकृतीमधील रेखांकित केलेला भाग
हा $\frac{3}{4}$ अपूर्णांक दर्शविते.
हे तीन चतुर्थांश असे वाचतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**डाव्या बाजूला असलेली आकृती अपूर्णांक दर्शविते. तो अपूर्णांक दिलेल्या मोकळ्या जागेत लिहा.**

| | |
|---|---|
| a)  | (नमूना)<br>1) $\frac{1}{2}$ एक द्वितीयांश |
| b)  | 2) |
| c)  | 3) |
| d)  | 4) |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## 1. अपूर्णांक दर्शविणारे चित्र ओळखा आणि '✓' अशी खूण करा.

| उदाहरण 2: | a) $\frac{1}{2}$ | <br>A | <br>B ✓ | <br>C |
|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| b) $\frac{1}{4}$ | <br>A | <br>B | <br>C |
| c) $\frac{3}{4}$ | <br>A | <br>B | <br>C |
| d) $\frac{1}{3}$ | <br>A<br>A | <br>B<br>B | <br>C<br>C |
| e) $\frac{2}{3}$ | <br>A | <br>B | <br>C |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय 9.1

**I. खालील पूर्ण करा.**

a) $\frac{1}{4}$ भाग रंगवा



b) $\frac{1}{2}$ भाग रंगवा



c) $\frac{3}{4}$ भाग रंगवा



d) $\frac{2}{3}$ भाग रंगवा



**II. दिलेल्या चित्रावरून योग्य अपूर्णांकाला गोल करा.**

| | |
|---|---|
| a)  | $\frac{1}{2}$ $\frac{1}{3}$ $\frac{1}{4}$ |
| b)  | $\frac{1}{2}$ $\frac{1}{3}$ $\frac{1}{4}$ |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**III. खालील चित्रातील $\frac{1}{3}$ भाग रेखांकित करा.**

a) 

b) 

## अपूर्णांक

एका पेपरचे चार समान भाग कसे करतात. ते तुम्ही शिकला आहात.



बाजूच्या आकृतीमध्ये असलेला अपूर्णांक

____________ असा लिहितात व

____________ असा वाचतात.

### 4 भाग काय दर्शविते ?

4 हे कागदाचे एकूण भाग दर्शविते, होय कि नाही ?

1 ला काय म्हणतात ?

याला रेखांकित भाग म्हणतात.

तुम्हाला माहीत आहे येथे अपूर्णांक $\frac{1}{4}$ असून तो एक चतुर्थांश असा वाचतात.

येथे 4 ला छेद व 1 ला अंश म्हणतात.

| | |
|---|---|
| 1 → अंश<br>4 → छेद | **विचार करा:** कोणत्याही अपूर्णांकात, अंश व छेद काय दर्शवितात ? |

$$\frac{1}{4} = \frac{\text{रेखांकित केलेले एकूण भाग}}{\text{संपूर्ण भागामधील एकूण समान भाग}}$$

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**लक्षात ठेवा: एखाद्या पूर्णांकांच्या प्रत्येक भागांना अपूर्णांक म्हणतात.**

**उदाहरण :**

| | | |
|---|---|---|
|  |  |  |
| पूर्ण | समान<br>दाने भाग | दोन समान भागापैकी<br>एक भाग रेखांकित |

$$\text{अपूर्णांक (Fraction)} = \frac{\text{अंश}}{\text{छेद}} = \frac{\text{Numerator}}{\text{Denominator}}$$

**अंश :** अपूर्णांकाच्या समान भागामधील निवडलेल्या भागाना अंश म्हणतात.

**छेद :** पूर्णांकांच्या समान भागांना छेद म्हणतात.

**उदाहरण :**

a)



आकृतीमधील कोणता अपूर्णांक रेखांकित केला आहे?

तो $\frac{2}{3}$ आहे.

2 व 3 काय दर्शवितात? लिहा.

2 हे ____________

3 हे ____________

b)



b) रेखांकित केलेला अपूर्णांक

हा $\frac{1}{5}$ आहे येथे

1 व 5 काय दर्शवितात? लिहा.

__________________

__________________

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

c)



c) रेखांकित केलेला अपूर्णांक ___________

अंश ___________

छेद ___________

d)



d) रेखांकित केलेला अपूर्णांक ___________

अंश ___________

छेद ___________

e)



e) रेखांकित केलेला अपूर्णांक ________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**योग्य उत्तराने खालील कृती पूर्ण करा.**



जॉनच्या वडीलांनी त्याच्या वाढदिवशी एक लहान केक विकत आणला. त्याचे 8 समान भाग केले.

त्यातील 1 भाग जॉनला दिला, 2 भाग रेवतीला दिले, 3 भाग रहिमने घेतले

हे अपूर्णांकांत कसे लिहितात ते पाहू.

प्रथम जॉनच्या वडीलांनी केकचे ______________ समान भाग केले.

केकचे जॉनला दिलेले भाग _______________

केकचे रेवतीला दिलेले भाग _______________

केकचे रहिमला दिलले  भाग _______________

येथे 1, 2, 3 हे दर्शवितात _______________

8 हे दर्शवितात _______________

**चित्रमय पद्धतीने केकचे केलेले भाग पाहू.**



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कृती :**

शिल्पा, हुसेन आणि नवीन यांना दिलखुष आवडत असल्यामुळे ते बेकरीमध्ये गेले.

शिल्पा :आम्हाला दिलखुष पाहिजे.

हुसेन : प्रत्येकाला एक ! वाह !

नवीन : मला सुद्धा 1 दिलखुष.

खाली दिलेल्या यादीप्रमाणे दिलखुष त्यांनी खाल्ले आहेत . निरीक्षण करा.

| नांव | पूर्ण दिलखुष | एकूण भाग | त्यांनी खाल्लेले भाग | |
|---|---|---|---|---|
| शिल्पा |  |  |  | 2 भागापैकी तिने 1 भाग खाल्ला. म्हणजेच तिने $\frac{1}{2}$ भाग खाल्ला. |
| हुसेन |  |  |  | 4 भागापैकी त्याने 2 भाग खाल्ले म्हणजेच त्यांनी $\frac{2}{4}$ भाग खाल्ला. |
| नवीन |  |  |  | 8 समान भागापैकी त्याने 4 भाग खाल्ले म्हणजेच त्याने $\frac{4}{8}$ = भाग खाल्ले. |

प्रत्येकाने दिलखुषचे खाल्लेले भाग अपूर्णांकात खालीलपैकी लिहितात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिल्पाने $\frac{1}{2}$ भाग खाल्ले आहेत.

हुसेन $\frac{2}{4}$ भाग खाल्ले आहेत.

नवीन $\frac{4}{8}$ भाग खाल्ले आहेत.

पुढिल चित्रामध्ये प्रत्येकाने खाल्लेल्या भागांचे निरीक्षण करा.

| | | |
|---|---|---|
| शिल्पा |  | $\frac{1}{2}$ |
| हुसेन |  | $\frac{2}{4}$ |
| नवीन |  | $\frac{4}{8}$ |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

$\frac{1}{2}$ , $\frac{2}{4}$ , $\frac{4}{8}$ हे भाग पूर्ण दिलखुष दर्शवितात का? विचार करा.

वरील चित्राचे निरिक्षण करा.

$\frac{1}{2}$, $\frac{2}{4}$, $\frac{4}{8}$ प्रत्यके भाग पूर्ण भागाचा अर्धा भाग आहे का? होय की नाही?

यालाच समान अपूर्णांक म्हणतात.

जे अपूर्णांक समान प्रमाण दर्शवितात, त्यांना समान अपूर्णांक म्हणतात.

**उदाहरण :**

| | |
|---|---|
|  | **1) समान मापाचे तीन पेपर घ्या. त्यापैकी एका पेपरची घडी घालून तीन समान भाग करा.**<br>एक भाग लाल रंगाने रंगवा<br>त्याचा दर्शविणारा अपूर्णांक लिहा __________ |
|  | **2) दुसऱ्या पेपरची घडी घालून त्याचे 6 समान भाग करा.**<br>**त्याचा दर्शविणारा अपूर्णांक लिहा __________** |
|  | **3) तिसऱ्या पेपरची घडी घालून आकृतीत दाखविल्याप्रमाणे 9 समान भाग करून त्यातील**<br>**तीन भागांना पिवळ्या रंगाने रंगवा.**<br>**दर्शविणारा अपूर्णांक लिहा ______________**<br>**वरील आकृतीचे निरिक्षण केले असता तुम्हाला काय समजले?**<br>**वरील तीन अपूर्णांक $\frac{1}{3}$ भाग दर्शवितात. होय की नाही? ते कोणत्या प्रकारचे अपूर्णांक आहेत?**<br>__________ |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## दिलेल्या अपूर्णांकांचे सममूल्य अपूर्णांक ओळखा.

या उदाहरणाचे निरीक्षण करा.

| | |
|---|---|
| $\frac{2}{3}$ समान संख्येने अंशाला व छेदाला गुणा. |  |
| $\frac{2}{3} = \frac{2 \times 2}{3 \times 2} = \frac{4}{6}$ (2 ने गुणून) |  |
| याचप्रमाणे अपूर्णांकाला 3 व 4 ने गुणून. | |
| $\frac{2}{3} = \frac{2 \times 3}{3 \times 3} = \frac{6}{9}$ |  |
| $\frac{2}{3} = \frac{2 \times 4}{3 \times 4} = \frac{8}{12}$ |  |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आता $\frac{4}{6}, \frac{6}{9}, \frac{8}{12}$ हे $\frac{2}{3}$ अपूर्णांकापासून मिळतात $\frac{2}{3}$ सममूल्य अपूर्णांक आहे.

सममूल्य अपूर्णांक मिळविण्यासाठी दोन्ही अंश व छेदाला समान संख्येने गुणावे.

**उदाहरण 2:** $\frac{4}{5}$ चे 3 सममूल्य अपूर्णांक लिहा. अंशाला व छेदाला 2 ने गुणा.

$\frac{4}{5} = \frac{4 \times 2}{5 \times 2} = \frac{8}{10}$ अंशाला व छेदाला 2 ने गुणा.

$\frac{4}{5} = \frac{4 \times 3}{5 \times 3} = \frac{12}{15}$ अंशाला व छेदाला 3 ने गुणा.

$\frac{4}{5} = \frac{4 \times 4}{5 \times 4} = \frac{16}{20}$ अंशाला व छेदाला 4 ने गुणा.

$\frac{4}{5} = \frac{8}{10}, \frac{12}{15}, \frac{16}{20}$ हे सममूल्य अपूर्णांक आहेत.

## स्वाध्याय 9.2

**I. खालील रिकाम्या जागेत योग्य उत्तर भरा.**

1) $\frac{3}{8}, \frac{6}{16},$ ____

2) $\frac{1}{5}$ ____ $\frac{3}{15}$

3) $\frac{2}{3}, \frac{4}{6}$ ____

4) ____ $\frac{4}{6}, \frac{6}{9}$

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**II. खालील अपूर्णांकाचें दोन समान (सममूल्य) अपूर्णांक लिहा.**

1) $\frac{1}{4}$

2) $\frac{1}{16}$

3) $\frac{1}{3}$

4) $\frac{2}{3}$

5) $\frac{2}{5}$

## दशांश अपूर्णांक

**खालील आकृतींचे निरीक्षण करा. यांचा कशासाठी उपयोग करतात. ते लिहा.**

| | |
|---|---|
| स्वयंपाकासाठी लागणारे इंधन<br>इंधन (वजन 14.6 kg ) |  |

एक शर्ट शिवण्यासाठी 2.5 मी. कापड लागते. या उदाहरणातील प्रमाणांचे रूपांतर कसे करतात? लिहा.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

या संख्या समजण्यासाठी खालील उदाहरणांचे निरिक्षण करा.

**उदाहरण 1:**



हा पूर्ण चौरस



या चौरसामध्ये 10 समान भाग करा. 1 भागामध्ये रंग भरा. हा अपूर्णांकांत $\frac{1}{10}$ असा लिहितात. हा 10 पैकी 1 भाग आहे. हा 0.1 असा वेगळ्या स्वरूपात लिहितात. या लिहिण्याच्या पद्धतीला दशांश पद्धत म्हणतात. हा 0 पूर्णांक 1 दशांश असा वाचतात। $\frac{1}{10} = 0.1$



वरील चौरसाचे 100 समान भाग करा. 1 भागामध्ये रंग दिल्यावर अपूर्णांक कसा येतो? हा $\frac{1}{100}$ असा लिहितात. दशांश अपूर्णांकात हा 0.01 असा लिहितात. आणि 0 पूर्णांक 1 शतांश असे वाचतात. $\frac{1}{100} = 0.01$

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उदाहरण 2:** पुढे दिलेल्या आयतामध्ये 10 समान भाग आहेत. त्यातील 1 भाग लाल रंगाने रंगवा.



अपूर्णांकात येणाऱ्या छेदातील दशांश स्वरूपाचे निरीक्षण करा. अपूर्णांकात $\frac{1}{10}$ हे (एक दशांश) व दशांशात हे 0.1 दर्शवितात. (0 पूर्णांक 1 दशांश असे वाचताता)

1) आयताचे 10 समान भाग खाली दिले आहेत. 2 भाग हिरव्या रंगाने रंगवा.



हे दशांशाचे स्वरूप आहे. छेद संख्येचे निरिक्षण करा. अपूर्णांकात हे म्हणतात व दशांशात हे 0.2 (0 पूर्णांक 2 दशांश) दर्शवितात.

2) दिलेल्या आयतामधील 3 भाग निळ्या रंगाने रंगवा हे 0.3 (0 पूणांक 3 दशांश) दर्शवितात.



## IV. खालील वर्तुळाचे निरीक्षण करा.



1. रेखाकित केलेले भाग किती?__________

2 आम्ही दशांश अपूर्णांकात $\frac{2}{10}$ असा लिहितो आणि ....................असा वाचतो.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED




$\frac{2}{10}$ हे दशांशात ................................ असे लिहितात.



$\frac{3}{10}$ हे दशांशात ................................ असे लिहितात.

विचार करा: 0.1, 0.2, 0.3 काय दर्शवितात?

वरील उदाहरणांचे निरिक्षण केले असता दशांश अपूर्णांकाचा एकमेकाशी संबंध असतो. हे समजते.।

**टीप :** संख्येचे दशाशं अपुर्णाकांत् रूपांतर करायचे असेल तर पूर्ण भागाचे 10 समान भाग केले पाहिजेत.

## संख्यारेषेवर दशांश अपूर्णांक कसे दर्शवितात ते पाहू –

संख्यारेषेवर आपण 1 ते 10 पर्यंतच्या संख्याचे स्थान दर्शवू




## खालील प्रसंग पाहा :

पट्टीवर 1 ते 2 मध्ये 10 समान भाग येतात. संख्यारेषेवर 0 ते 1 मधील भाग

आकृतीत लिहू




तेजा कोणत्या संख्येवर उभा आहे.
त्याला 0.1 म्हणतो. तो दशांश अपूर्णांक आहे.
हसिना कोठे आहे? 0.3
मंजू कोठे आहे? 1.0

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**सूचना :** संख्यारेषेवर 0 आणि 1 मध्ये 10 समान भाग आहेत.

म्हणजे $\frac{1}{10} \times 1 = \frac{1}{10}$

**समजावून घ्या**

एक दशाश

$\frac{1}{10} = 0.1$

10 भागापैकी एकूण घेतलेले भाग

एक शंभरांश :-

$\frac{1}{100} = 0.01$

100 भागापैकी एकूण घेतलेले भाग

स्थानमूल्य तक्त्यात दशांश अपूर्णांक कसे लिहितात? आठवा, स्थानमूल्य तक्त्याविषयी काय शिकला आहात.

| सहस्त्र | शतक | दशक | सुटे |
|---|---|---|---|
| 1000 | 100 | 10 | 1 |

स्थान मूल्य तक्त्यात 10 आणि 100 कसे लिहितात ते शिकला आहे

विचार करा, $\frac{1}{10}$ कसे लिहितात.

| सहत्र | शंभर | दहा | सुटे | . | एक दशांश | एक शतांश |
|---|---|---|---|---|---|---|
| 1000 | 100 | 10 | 1 | . | $\frac{1}{10}$ | $\frac{1}{100}$ |
| | | | | | | |

पूर्णांक भाग ← दशांश चिन्ह (बिंदू) → दशांश भाग

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्थानमूल्य तक्त्याचे निरीक्षण करा. दशांश चिन्हाच्या डाव्या बाजूकडील दशांश अंक व उजव्या बाजूकडील दशांश अंक ओळखा.

अंकांच्या स्थानमूल्याची किंमत जेव्हा आपण उजवीकडून डावीकडे जातो तेंव्हा ती किंमत वाढते याचे निरिक्षण करा.

अंकाच्या स्थानमूल्यांची किंमत दशांश चिन्हाच्या उजव्या बाजूकडे गेले असता ती किंमत वाढते कि कमी होते? ते ओळखा.

**खालील तक्त्याचे निरीक्षण करा.**

| अपूर्णांक | अंश | छेद | दशांश पद्धत |
|---|---|---|---|
| 1) $\frac{1}{10}$ | 1 | 10 | 0.1 |
| 2) $\frac{2}{10}$ | 2 | 10 | 0.2 |
| 3) $\frac{3}{10}$ | 3 | 10 | 0.3 |
| 4) $\frac{1}{100}$ | 1 | 100 | 0.01 |
| 5) $\frac{2}{100}$ | 2 | 100 | 0.02 |
| 6) $\frac{3}{100}$ | 3 | 100 | 0.03 |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुटे व दशक स्थानामधील बिंदूंचे निरिक्षण करा. त्या बिंदूला दशांश बिंदू म्हणतात. हा पूर्ण भाग आणि अपूर्णांक भाग वेगळा करतो.

**टीप :**

- एखाद्या संख्येत दशांश बिंदू असेल तर तिला दशांश अपूर्णांक संख्या म्हणतात.
- अपूर्णांक दर्शविण्याचे दशांश हे स्वरूप आहे.
- दशांश म्हणजेच अपूर्णांकातील 10, 100, 1000...........इ. छेद होय.

**कृती: खालील आकृतीचे निरीक्षण करा.**




पीटर लहान पेन्सिलची लांबी पट्टीने मोजण्याचा प्रयत्न करत आहे.

मेरी : पीटर, पेन्सिलची लांबी किती आहे?

पीटर : पीटर म्हणाला, 3 सें.मी. पेक्षा मोठी परंतू 4 सें.मी. पेक्षा लहान आहे.

मेरी : ही लांबी कशी मोजतात. मोजमाप पूर्ण संख्येमध्ये नसेल तर मी तुला सांगतो लांबी कशी मोजतात.

**पुढील वाक्यात मोजमापचे निरीक्षण करा :**

- येथे 1 सें.मी. मध्ये 10 समान भाग आहेत. प्रत्येक भाग $\frac{1}{10}$ भाग असतो.
- $\frac{1}{10}$ ला 0.1 म्हणतात.
- हे बिंदू शून्य सेंटीमीटर किंवा शून्य पूर्णांक एक दशांश असे वाचतात. पीटर, आता मला सागं पेन्सिलची बरोबर लांबी.
- 3 सें.मी. व 8 दशांश सें.मी. आहे. याचाच अर्थ 3.8 सें.मी. हे वाचताना "3 पूर्णांक 8 दशांश" असे वाचतात.

दशांश चिन्ह असलेल्या संख्येला दशांश अपूर्णांक म्हणतात. वरील संख्यारेषेवर असलेली कृती हे त्याचे उदाहरण आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय 9.3

**1) खालील दशांश अपूर्णांक वाचा आणि ते अक्षरात लिहा.**

1) 0.2 2) 0.5 3) 0.7

4) 0.21 5) 0.02 6) 0.15

**2) खाली दिलेले दशांश अपूर्णांकात लिहा.**

1) शून्य पूर्णांक तीन दशांश

2) शून्य पूर्णांक सहा दशांश

3) शून्य पूर्णांक सात दशांश

4) शून्य पूर्णांक चार दशांश

5) शून्य पूर्णांक पाच दशांश

**3) खालील अपूर्णांक, दशांश अपूर्णांकात लिहा.**

1) $\frac{1}{10}$

2) $\frac{2}{10}$

3) $\frac{3}{10}$

4) $\frac{5}{10}$

5) $\frac{2}{100}$

6) $\frac{5}{100}$

@KTBS NOT TO BE REPUBLISHED